## प्रकरण चौथे

# संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

# प्रकरण चौथे
# संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

यापूर्वी तिसऱ्या प्रकरणामध्ये संशोधिकेने संशोधनाच्या कार्यपद्धतीचे वर्णन केले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये संकलित माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण व अर्थनिर्वचन केले आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने नियोजित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रश्नावलीचा व मुलाखतीचा वापर संशोधनाची साधने म्हणून केला आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरांवर तसेच महाविद्यालयीन स्तरावर पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे शिक्षक, मुख्याध्यापक व प्राचार्य यांच्याकडून माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली हे साधन वापरले आहे. तर विद्यार्थ्यांकडून माहिती मिळविण्यासाठी मुलाखत सूचीचा वापर केला.

अशाप्रकारे संकलित केलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण पुढील सारण्यांमध्ये मांडलेले आहे.

अर्थनिर्वचनासाठी पुढील सर्वसामान्य निकष लावण्यात आले आहेत.

| टक्केवारी | अर्थनिर्वचन |
|---|---|
| ५५% पेक्षा अधिक | बहुतांशी |
| ५०% | निम्मे |
| ४५% ते ५४% | जवळपास निम्मे |
| ३१% ते ४४% | अल्प |
| ३०% पेक्षा कमी | अत्यल्प |

## सारणी क्र.१
## आठवडयातील पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांबाबत पर्यावरण शिक्षकांनी दिलेली माहिती.

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१** | **आठवडयात पर्यावरण शिक्षणासाठी इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी किती तासिका आहेत?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | ३ तासिका | | २ तासिका | | ४ तासिका | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | १७ | १००% | ६ | १००% | ५ | १००% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. १००% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात ३ तासिका आहेत.

२. १००% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयाला २ तासिका आहेत.

३. १००% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयाला ४ तासिका आहेत.

### अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येते की, इ.९वी, इ.१०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयाला ३ तासिका आहेत, इ.११वी, इ.१२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयाला २ तासिका आहेत. तर बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या द्वितीय वर्षासाठी आठवडयाला ४ तासिका आहेत.

## सारणी क्र.२
## आठवडयातील पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांबाबत मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी दिलेली माहिती.

| मुख्याध्यापक/ प्राचार्य प्रश्न क्र.१ | इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/ एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सीसाठी आठवडयात पर्यावरण शिक्षणासाठी किती तासिका आहेत? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा - १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये - ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये - ३ प्राचार्य) | |
| | ३ तासिका | | २ तासिका | | ४ तासिका | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | १३ | १००% | ४ | १००% | ३ | १००% |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. १००% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी एका आठवडयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या ३ तासिका आहेत.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी एका आठवडयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या २ तासिका आहेत.

३. वरिष्ठ महाविद्यालयांच्या १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीच्या एका आठवडयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या ४ तासिका आहेत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. सर्व (१००%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, इ.१०वीसाठी एका आठवडयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या ३ तासिका आहेत.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या सर्व (१००%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, इ.१२वीसाठी एका आठवडयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या २ तासिका आहेत

३. वरिष्ठ महाविद्यालयांच्या सर्व (१००%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी एका आठवडयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या ४ तासिका आहेत.

## सारणी क्र.३
## पर्यावरण शिक्षणासाठीच्या तासिकांच्या प्रमाणाबाबत पर्यावरण शिक्षकांची मते

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२** | **इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी वरील तासिकांचे प्रमाण आपणांस कसे वाटते?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | कमी | | पुरेसे | | कमी | | पुरेसे | | कमी | | पुरेसे | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ९ | ५३% | ८ | ४७% | ४ | ६७% | २ | ३३% | ३ | ६०% | २ | ४०% |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ५३% शिक्षकांच्या मते, इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित ४७% शिक्षकांच्या मते, इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण पुरेसे आहे.

२. इ.११वी, १२वीच्या ६७% शिक्षकांच्या मते, इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित ३३% शिक्षकांच्या मते, इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण पुरेसे आहे.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ६०% शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित ४०% शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण पुरेसे आहे.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, इ.१०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या जवळपास निम्म्या (५३%) शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित जवळपास निम्म्या (४७%) शिक्षकांच्या मते तासिकांचे हे प्रमाण पुरेसे आहे.

२. इ.११वी, इ.१२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (६७%) शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित अल्प (३३%) शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे हे प्रमाण पुरेसे आहे.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (६०%) शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित अल्प (४०%) शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे हे प्रमाण पुरेसे आहे.

**सारणी क्र.४**

**पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांच्या प्रमाणाबाबतची मुख्याध्यापकांची/प्राचार्यांची मते**

| **मुख्याध्यापक/ प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.२** | **इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण आपणांस कसे वाटते?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| कमी | ६ | ४६% | ३ | ७५% | २ | ६७% |
| पुरेसे | ७ | ५४% | १ | २५% | १ | ३३% |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ४६% मुख्याध्यापकांच्या मते, इ.९वी, १०वीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित ५४% मुख्याध्यापकांच्या मते, इ.९वी, १०वीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण पुरेसे आहे.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या ७५% प्राचार्यांच्या मते, इ.११वी, १२वीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण कनी वाटते. उर्वरित २५% प्राचार्यांच्या मते, इ.११वी, १२वीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण पुरेसे आहे.

३. वरिष्ठ महाविद्यालयांच्या ६७% प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित ३३% प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे प्रमाण पुरेसे आहे.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. जवळपास निम्म्या (४६%) मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित जवळपास निम्म्या (५४%) मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण पुरेसे आहे.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या बहुतांशी (७५%) प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण कमी

आहे. उर्वरित अत्यल्प (२५%) प्राचार्यांच्या मते पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचे हे प्रमाण पुरेसे आहे.

३. वरिष्ठ महाविद्यालयांच्या बहुतांशी (६७%) प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण कमी आहे. उर्वरित अल्प (३३%) प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी आठवडयातील पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांचे प्रमाण पुरेसे आहे.

## सारणी क्र.५
## पर्यावरण शिक्षणाच्या तासिका आठवडयाला किती असाव्यात याबाबतची पर्यावरण शिक्षकांची मते

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण किती तासिका असाव्यात? | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | आठवडयातील तासिका | इ.९वी, १०वी (१३ शाळा - १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये - ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये - ५ शिक्षक) | |
| | | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ३ | ०८ | ४७% | ०० | ०० | ०० | ०० |
| | ४ | ०० | ०० | ०१ | १७% | ०० | ०० |
| | ५ | ०९ | ५३% | ०० | ०० | ०० | ०० |
| | ६ | ०० | ०० | ५ | ८३% | ५ | १००% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ४७% पर्यावरण शिक्षकांच्या मते, इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ३ तासिका असाव्यात. उर्वरित ५३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ५ तासिका असाव्यात.

२. इ.११वी, १२वीच्या १७% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ४ तासिका असाव्यात. उर्वरित ८३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ६ तासिका असाव्यात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते, एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ६ तासिका असाव्यात.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, इ.१०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या जवळपास निम्म्या (४७%) शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ३ तासिका असाव्यात. उर्वरित जवळपास निम्म्या (५३%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ५ तासिका असाव्यात.

२. इ.११वी, इ.१२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (१७%) शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ४ तासिका असाव्यात. बहुतांशी (८३%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ६ तासिका असाव्यात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या आठवडयात एकूण ६ तासिका असाव्यात.

## सारणी क्र.६
## पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका वेळापत्रकात समाविष्ट करताना पर्यावरण शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्या

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.४** | **इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयाच्या तासिका वेळापत्रका मध्ये समाविष्ट करताना कोणत्या समस्या जाणवल्या?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| १. पर्यावरण शिक्षण विषयासाठी कमी तासिका मिळतात. | ०३ | १७% | ०१ | १७% | ०० | ०० |
| २. तज्ज्ञ शिक्षकांची कमतरता आहे. | ०२ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |
| ३. वेळापत्रकात तासिका बसवणे अवघड जाते. | ०२ | १२% | ०२ | ३३% | ०१ | २०% |
| ४. गणित व विज्ञान विषयाची उजळणी घेता येत नाही. | ०३ | १७% | ०० | ०० | ०० | ०० |
| ५. महत्वाचे विषय सकाळी असल्यामुळे पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका दुपारी ठेवाव्या लागल्या. | ०३ | १७% | ०२ | ३३% | ०० | ०० |
| ६. तासिका शेवटी असल्याने विद्यार्थ्यांची अनुपस्थिती | ०२ | १२% | ०० | ०० | ०२ | ४०% |
| ७. तासिका शेवटी असल्याने शिकविण्यास उत्साह वाटत नाही. | ०२ | १२% | ०१ | १७% | ०२ | ४०% |
| ८. कोणतीही समस्या नाही. | ०२ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार, इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका वेळापत्रकात समाविष्ट करताना त्यांना जाणवलेली समस्या म्हणजे पर्यावरण शिक्षण विषयासाठी त्यांना कमी तासिका मिळतात. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या

पर्यावरण शिक्षण विषय शिकविण्यासाठी तज्ज्ञ शिक्षकांची कमतरता आहे. १२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, इ.१०वीसाठी वेळापत्रकात पर्यावरण शिक्षणाच्या तासिका बसवणे अवघड जाते. १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार गणित व विज्ञान विषयाची उजळणी पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकांमुळे घेता येत नाही. १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, इ.१०वी वर्गाचे महत्वाचे विषय सकाळी असल्यामुळे पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका दुपारी ठेवाव्या लागल्या. १२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या वेळापत्रकात पर्यावरण शिक्षणाच्या शेवटी तासिका असल्याने विद्यार्थ्यांची अनुपस्थिती असते. १२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी व इ.१०वीच्या वेळापत्रकात पर्यावरण शिक्षणाच्या शेवटी तासिका असल्याने शिकविण्यात उत्साह वाटत नाही. उर्वरित १२% पर्यावरण शिक्षकांना वरील प्रश्नासंबंधी कोणतीही समस्या जाणवत नाही.

२. इ.११वी, १२वीच्या १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२ वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका वेळापत्रकात समाविष्ट करताना त्यांना जाणवणारी समस्या म्हणजे पर्यावरण शिक्षण विषयासाठी कमी तासिका मिळतात. ३३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठीच्या वेळापत्रकात पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका बसवणे अवघड जाते. ३३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, इ.१२वी वर्गाचे महत्वाचे विषय सकाळी असल्यामुळे पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका दुपारी ठेवाव्या लागल्या. १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, इ.१२वीच्या वेळापत्रकात पर्यावरण शिक्षण विषयाच्या शेवटी तासिका असल्याने शिकविण्यास उत्साह वाटत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका वेळापत्रकात समाविष्ट करताना त्यांना जाणवणारी समस्या म्हणजे पर्यावरण विषयाच्या तासिका वेळापत्रकात बसविणे अवघड जाते. ४०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या वेळापत्रकात पर्यावरण विषयाच्या शेवटी तासिका असल्याने विद्यार्थ्यांची अनुपस्थिती असते. उर्वरित ४०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या वेळापत्रकात पर्यावरण शिक्षण विषयाच्या शेवटी तासिका असल्याने त्यांना शिकवण्यास उत्साह वाटत नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, इ.१०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या वेळापत्रकात पर्यावरण विषयाच्या तासिका समाविष्ट करताना पुढील समस्या येतात.

   १. पर्यावरण शिक्षण विषयासाठी त्यांना कमी तासिका मिळतात.
   २. पर्यावरण विषय शिकविण्यासाठी तज्ज्ञ शिक्षकांची कमतरता आहे.
   ३. वेळापत्रकात पर्यावरण शिक्षणाच्या तासिका बसविणे अवघड जाते.
   ४. गणित व विज्ञान विषयाची उजळणी पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिकामुळे घेता येत नाही.
   ५. महत्वाचे विषय सकाळी असल्यामुळे पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका दुपारी ठेवाव्या लागल्या.

६. पर्यावरण विषयाच्या तासिका शेवटी असल्याने विद्यार्थ्यांची अनुपस्थिती असते.

७. पर्यावरण विषयाच्या तासिका शेवटी असल्याने शिकविण्यास उत्साह वाटत नाही.

२. इ.११वी, इ.१२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या वेळापत्रकात पर्यावरण विषयाच्या तासिका समाविष्ट करताना पुढील समस्या येतात.

१. पर्यावरण शिक्षण विषयासाठी कमी तासिका मिळतात.

२. वेळापत्रकात पर्यावरण शिक्षणाच्या तासिका बसविणे अवघड जाते.

३. महत्वाचे विषय सकाळी असल्यामुळे पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका दुपारी ठेवाव्या लागल्या.

४. वेळापत्रकात पर्यावरण शिक्षण विषयाच्या शेवटी तासिका असल्याने शिकविण्यास उत्साह वाटत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या वेळापत्रकात पर्यावरण विषयाच्या तासिका समाविष्ट करताना पुढील समस्या येतात.

१. पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका वेळापत्रकात बसविणे अवघड जाते.

२. पर्यावरण विषयाच्या तासिका शेवटी असल्याने विद्यार्थ्यांची अनुपस्थिती असते.

३. पर्यावरण विषयाच्या शेवटी तासिका असल्याने त्यांना शिकविण्यास उत्साह वाटत नाही.

## सारणी क्र.७

## पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका वेळापत्रकात समाविष्ट करताना मुख्याध्यापक/प्राचार्यांना जाणवलेल्या समस्या

| मुख्याध्यापक/प्रा--चार्य प्रश्नावली प्रश्न क्र.३ | इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयाच्या तासिका वेळापत्रका मध्ये समाविष्ट करताना कोणत्या समस्या आल्या? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| १. इतर विषयाच्या तासिका कमी कराव्या लागल्या. | ७ | ५४% | ३ | ७५% | ०० | ०० |
| २. शिक्षक व तासिकांचा मेळ बसत नाही. | ३ | २३% | १ | २५% | ०० | ०० |
| ३. शिक्षकांच्या कामाचा कालावधी वाढतो. | २ | १५% | ०० | ०० | ०० | ०० |
| ४. विषयास वेळापत्रकात गौण स्थान द्यावे लागते. इतर विषयाच्या तासिकांना जास्त महत्व द्यावे लागते. | ०० | ०० | ०० | ०० | १ | ३३% |
| ५. विषय आवश्यक पण तासिका शेवटची त्यामुळे त्याला विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी. | ०० | ०० | ०० | ०० | २ | ६७% |
| ६. समस्या आल्या नाहीत. | ३ | २३% | ०० | ०० | ०० | ००% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ५४% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाविषयी तासिका वेळापत्रकामध्ये समाविष्ठ करताना इतर विषयाच्या तासिका कमी कराव्या लागल्या. २३% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार वेळापत्रकात पर्यावरण विषयाच्या तासिका समाविष्ट करताना शिक्षक व तासिकांचा मेळ बसत नाही असे वाटते. १५% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार वेळापत्रकात पर्यावरण विषयाच्या तासिका समाविष्ठ करताना शिक्षकांच्या कामाचा कालावधी वाढतो. उर्वरित २३% मुख्याध्यापकांच्या

सांगण्यानुसार त्यांना वेळापत्रकात पर्यावरण विषयाच्या तासिका समाविष्ठ करताना समस्या आल्या नाहीत.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या ७५% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयाच्या तासिका वेळापत्रकात समाविष्ट करताना इतर विषयांच्या तासिका कमी कराव्या लागल्या. उर्वरित २५% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयांच्या तासिका वेळापत्रकात समाविष्ट करताना शिक्षक व तासिकांचा मेळ बसवता येत नाही.

४. वरिष्ठ महाविद्यालयांच्या ३३% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार, एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयाच्या तासिका वेळापत्रकात समाविष्ट करताना पर्यावरण विषयास वेळापत्रकात गौण स्थान दिले गेले. इतर विषयांच्या तासिकांना महत्व जास्त दिले गेले. उर्वरित ६७% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार वेळापत्रकात पर्यावरण विषय हा आवश्यक म्हंटले आहे आणि तासिका शेवटी ठेवली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची अनुपस्थिती जास्त आहे.

**अर्थनिर्वचन**

१. इ.९वी, इ.१०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिका वेळापत्रकामध्ये समाविष्ट करताना मुख्याध्यापकांना जाणवणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

   १. इतर विषयांच्या तासिका कमी कराव्या लागल्या.

   २. शिक्षक व तासिकांचा मेळ बसविता येत नाही.

   ३. शिक्षकांच्या कामाचा कालावधी वाढतो.

२. कनिष्ठ महाविदयालयाच्या इ.११वी, इ.१२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिका वेळापत्रकामध्ये समाविष्ट करताना प्राचार्यांना जाणवणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. इतर विषयांच्या तासिका कमी कराव्या लागल्या.

२. शिक्षक व तासिकांचा मेळ बसविता येत नाही.

३. वरिष्ठ महाविदयालयाच्या एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिका वेळापत्रकामध्ये समाविष्ट करताना प्राचार्यांना जाणवणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

१. पर्यावरण शिक्षण विषयास इतर विषयांच्या तुलनेत गौण स्थान द्यावे लागते.

२. पर्यावरण शिक्षणाच्या तासिका शेवटी ठेवाव्या लागतात.

## सारणी क्र.८
## उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो किंवा नाही याबाबतचे शिक्षकांचे अनुभव

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.५ | इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/ एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीवर्गाच्या पर्यावरण शिक्षण विषयाच्या उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकतो का? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ५ | २९% | १२ | ७१% | २ | ३३% | ४ | ६७% | २ | ४०% | ३ | ६०% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. २९% पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार इ.९वी, १०वीसाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित ७१% पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार इ.९वी, १० वी साठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकत नाही.

२. ३३% पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार इ.११वी, १२वीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित ६७% पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार इ.११वी, १२वीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकत नाही.

३. ४०% पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित ६०% पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकत नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. अत्यल्प (२९%) पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार इ.९वी, १०वीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित बहुतांशी (७१%) पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार इ.९वी, इ.१०वीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकत नाही.

२. अल्प (३३%) पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार इ.११वी, १२वीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार इ.११वी, इ.१२वीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकत नाही.

३. अल्प (४०%) पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम. /बी.एस्सीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो, उर्वरित बहुतांशी (६०%) पर्यावरण शिक्षकांच्या अनुभवानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकत नाही.

### सारणी क्र.९
### उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो किंवा नाही याबाबत मुख्याध्यापक/प्राचार्यांनी दिलेली माहिती

| मुख्याध्यापक/ प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.५ | इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी वर्गाच्या पर्यावरण शिक्षण विषयाच्या उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकतो का? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा - १३ मुख्याध्यापक) | | | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये -४ प्राचार्य) | | | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये - ३ प्राचार्य) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ६ | ४६% | ७ | ५४% | १ | २५% | ३ | ७५% | १ | ३३% | २ | ६७% |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की

१. ४६% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित ५४% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षण विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या २५% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित ७५% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या

पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षण विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

३. वरिष्ठ महाविद्यालयांच्या ३३% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित ६७% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षण विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. जवळपास निम्म्या (४६%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित जवळपास निम्म्या (५४%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, इ.१०वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या अत्यल्प (२५%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित बहुतांशी (७५%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, इ.१२वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

३. वरिष्ठ महाविद्यालयांच्या अल्प (३३%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होतो. उर्वरित बहुतांशी (६७%)

प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

**सारणी क्र. १०**

**अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी जादा तासिका घेण्याचे प्रयत्न**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.६** | **उपलब्ध तासिकांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण होवू शकत नसेल तर आपण अभ्यासक्रम कसा पूर्ण करता?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | **इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक)** | | **इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक)** | | **एस.वाय.बी.ए./बी.कॉम/बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक)** | |
| | **संख्या** | **टक्के** | **संख्या** | **टक्के** | **संख्या** | **टक्के** |
| जादा तास घेवून | १० | ५९% | ५ | ८३% | ३ | ६०% |
| इतर शिक्षक रजेवर असताना त्यांच्या तासांचा उपयोग करून | ४ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |
| क्षेत्रभेट देवून | ०० | ०० | २ | ३४% | २ | ४०% |
| अभ्यासक्रम वेळेत पूर्ण होतो. | ४ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. पर्यावरण शिक्षकांपैकी ५९% शिक्षक इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाचा अभ्यासक्रम जादा तास घेवून पूर्ण करतात. २३% शिक्षक इतर शिक्षक रजेवर असताना त्यांच्या तासाचा उपयोग करून अभ्यासक्रम पूर्ण करतात. उर्वरित २३% पर्यावरण शिक्षकांचा अभ्यासक्रम उपलब्ध तासिकेत पूर्ण होतो.

२. ८३% शिक्षक इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाचा अभ्यासक्रम जादा तास घेवून पूर्ण करतात. ३४% शिक्षक क्षेत्रभेट देवून अभ्यासक्रम पूर्ण करतात.

३. ६०% शिक्षक एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाचा अभ्यासक्रम जादा तास घेवून पूर्ण करतात. उर्वरित ४०% शिक्षक क्षेत्रभेट देवून अभ्यासक्रम पूर्ण करतात.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे बहुतांशी (५९%) शिक्षक इ.९वी, १०वी चा पर्यावरण शिक्षण या विषयाचा अभ्यासक्रम जादा तास घेवून पूर्ण करतात. अत्यल्प (२३%) शिक्षक इतर शिक्षक रजेवर असताना त्यांच्या तासाचा उपयोग करून अभ्यासक्रम पूर्ण करतात. उर्वरित अत्यल्प (२३%) पर्यावरण शिक्षकांचा अभ्यासक्रम उपलब्ध तासिकेत पूर्ण होतो.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे बहुतांशी (८३%) शिक्षक इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाचा अभ्यासक्रम जादा तास घेवून पूर्ण करतात. उर्वरित अल्प (३४%) शिक्षक क्षेत्रभेट देवून अभ्यासक्रम पूर्ण करतात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे बहुतांशी (६०%) शिक्षक एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाचा अभ्यासक्रम जादा तास घेवून पूर्ण करतात. उर्वरित अल्प (४०%) शिक्षक क्षेत्रभेट देवून अभ्यासक्रम पूर्ण करतात.

## सारणी क्र.११

## क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात किंवा नाही याबाबतचे पर्यावरण शिक्षकांचे अनुभव

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.७ | उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/ एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात का? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ५ | २९% | १२ | ७१% | ४ | ६७% | २ | ३३% | ५ | १००% | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की

१. २९% पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी उपलब्ध तासिकांच्या कालावधीत क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात. उर्वरित ७१% पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या जाणवत नाहीत.

२. इ.११वी, १२वीच्या ६७% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना त्यांना समस्या येतात. ३३% पर्यावरण शिक्षकांना इ.११वी, १२वीसाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या जाणवत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांना एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी उपलब्ध तासिकांच्या कालावधीत क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (२९%) पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांच्या कालावधीत क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात. उर्वरित बहुतांशी (७१%) पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी उपलब्ध असणाऱ्या तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या जाणवत नाहीत.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांना इ.११वी, १२वीसाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात. उर्वरित अत्यल्प (३३%) पर्यावरण शिक्षकांना इ.११वी, १२वीसाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या जाणवत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांना एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात.

## सारणी क्र.१२

## क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात किंवा नाही याबाबत मुख्याध्यापक/प्राचार्यांनी दिलेली माहिती

| मुख्याध्यापक/ प्राचार्य प्रश्न क्र.६ | उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/ एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी क्षेत्रभेटी सारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात का? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ८ | ६२% | ५ | ३८% | ४ | १००% | ०० | ०० | ३ | १००% | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ६२% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात. उर्वरित अल्प (३८%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येत नाही.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात.

३. वरिष्ठ महाविद्यालयांच्या १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणासाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येते की,

१. बहुतांशी (६२%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात. उर्वरित अल्प (३८%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, इ.१०वीच्या उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येत नाहीत.

२. कनिष्ठ महाविद्यालयांच्या सर्व (१००%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात.

३. वरिष्ठ महाविद्यालयांच्या सर्व (१००%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येतात.

## सारणी क्र.१३
## क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना पर्यावरण शिक्षकांना येणाऱ्या समस्या

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.८ | उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटी सारखे उपक्रम वेळा पत्रकात समाविष्ट करताना कोणत्या समस्या आल्या? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| १. क्षेत्रभेटीसाठी स्वतंत्र वेळ मिळत नाही. | ४ | २४% | १ | १७% | ३ | ६०% |
| २. ३० मिनिटात क्षेत्रभेट शक्य होत नाही. | २ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |
| ३. इतर विषयांवरती परिणाम होतो. | २ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |
| ४. विद्यार्थी संख्या जास्त असते. | १ | ६% | २ | ३३% | ०० | ०० |
| ५.गणित, विज्ञान या विषयांचा सराव कमी होतो. | २ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |
| ६. जास्त खर्च होतो. नियोजनात समस्या येतात. | २ | १२% | १ | १७% | ०० | ०० |
| ७. इतर विषयांच्या मानाने पर्यावरणाला महत्व कमी आहे. | २ | १२% | ०० | ०० | २ | ४०% |
| ८. कोणत्याही समस्या येत नाहीत. | ७ | ४१% | २ | ३३% | १ | २०% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. २४% पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसाठी स्वतंत्र वेळ मिळत नाही. १२% पर्यावरण शिक्षकांना ३० मिनिटात क्षेत्रभेट शक्य होत नाही. १२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इतर विषयावर त्याचा परिणाम होतो, ६% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना वेळ अपुरा पडतो तसेच विद्यार्थी संख्या जास्त असते. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते क्षेत्रभेटीमुळे गणित व विज्ञान या विषयांच्या सरावास वेळ देता येत नाही. १२%

पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार क्षेत्रभेटीसारख्या उपक्रमामुळे जादा खर्च होतो आणि नियोजनातही समस्या निर्माण होतात. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते इतर विषयाच्या मानाने पर्यावरण शिक्षण विषयाला कमी महत्व आहे. उर्वरीत ४१% पर्यावरण शिक्षकांना क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येत नाहीत.

२. इ.११वी, १२ वीच्या १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२ वीच्या उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना त्यांना क्षेत्रभेटीसाठी स्वतंत्र वेळ मिळत नाही. ३३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार क्षेत्रभेटी वेळापत्रकात समाविष्ट करताना विद्यार्थी संख्या भरमसाठ असते. १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार क्षेत्रभेटीसाठी जादा खर्च व नियोजनात समस्या येतात. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांना क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ६०% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठीच्या उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना त्यांना क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना त्यांना क्षेत्रभेटीसाठी स्वतंत्र वेळ मिळत नाही. ४०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इतर विषयांच्या मानाने पर्यावरण शिक्षण विषयास वेळापत्रकात महत्व कमी आहे. उर्वरित २०% पर्यावरण शिक्षकांना क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येत नाहीत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम राबविताना पर्यावरण शिक्षकांना पुढील समस्या येतात.

   १. उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसाठी स्वतंत्र वेळ मिळत नाही.
   २. ३० मिनिटांत क्षेत्रभेटीसारखे उपक्रम राबवणे शक्य होत नाही.
   ३. इतर विषयांवर परिणाम होतो.
   ४. क्षेत्रभेटीसाठी वेळ अपुरा व विद्यार्थी संख्या जास्त असते.
   ५. क्षेत्रभेटीमुळे गणित व विज्ञान या विषयाच्या सरावाला वेळ देता येत नाही.
   ६. क्षेत्रभेटीसारख्या उपक्रमांमुळे जादा खर्च होतो व नियोजनात समस्याही निर्माण होतात.
   ७. इतर विषयांच्या मानाने पर्यावरण शिक्षण या विषयाला कमी महत्व आहे.

२. इ.११वी, १२वीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम राबविताना पर्यावरण शिक्षकांना पुढील समस्या येतात.

   १. उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसाठी स्वतंत्र वेळ मिळत नाही.
   २. इतर विषयांवर क्षेत्रभेटीमुळे परिणाम होतो.
   ३. क्षेत्रभेटी वेळापत्रकात समाविष्ट करताना वेळ अपुरा पडतो व विद्यार्थी संख्या जास्त असते.
   ४. क्षेत्रभेटीसारख्या उपक्रमांमुळे जादा खर्च होतो व नियोजनातही समस्या निर्माण होतात.

५. इतर विषयांच्या मानाने पर्यावरण शिक्षण या विषयाला कमी महत्व आहे.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम राबविताना पर्यावरण शिक्षकांना पुढील समस्या येतात.

१. उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना स्वतंत्र वेळ मिळत नाही.

२. इतर विषयांच्या मानाने पर्यावरण शिक्षण या विषयाला वेळापत्रकात कमी महत्व आहे.

**सारणी क्र.१४**

**क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना मुख्याध्यापक/प्राचार्य यांना जाणवणाऱ्या समस्या**

| **मुख्याध्यापक / प्राचार्य प्रश्न क्र.७** | **उपलब्ध तासिकांचा कालावधी लक्षात घेता क्षेत्रभेटी सारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना कोणत्या समस्या आल्या?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये –४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| १. ३० मिनिटांत क्षेत्रभेट शक्य होत नाही, वेळ कमी. | ९ | ६९% | ४ | १००% | ०० | ०० |
| २.जादा खर्च | २ | १६% | ०० | ०० | ०० | ०० |
| ३. क्षेत्रभेटीचा कालावधी कमी व मानधन नाही. | ०० | ०० | ०० | ०० | ३ | १००% |
| ४. समस्या नाहीत. | ४ | ३१% | ०० | ०० | ०० | ०० |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ६९% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना ३० मिनिटांच्या तासिकेत क्षेत्रभेट शक्य

होत नाही. हा वेळ फार कमी वाटतो. १६% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार क्षेत्रभेटीसाठी जादा खर्च पडतो. उर्वरित ३१% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना समस्या येत नाहीत.

२. कनिष्ठ महाविद्यालयाच्या १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना ४० मिनिटाच्या तासिकेत क्षेत्रभेट शक्य होत नाही. हा वेळ फार कमी वाटतो.

३. वरिष्ठ महाविद्यालयाच्या १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना क्षेत्रभेटीसाठीचा कालावधी फार कमी वाटतो व क्षेत्रभेटीसाठी मानधनही दिले जात नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना मुख्याध्यापकांना येणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे

   १. ३० मिनिटाच्या तासिकेत क्षेत्रभेट शक्य होत नाही. हा वेळ फार कमी वाटतो.

   २. क्षेत्रभेटीसाठी जादा खर्च लागतो.

२. इ.११वी, १२वीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना येणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे

   १. ४० मिनिटाच्या तासिकेत क्षेत्रभेट शक्य होत नाही. हा वेळ फार कमी वाटतो.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी क्षेत्रभेटीसारखे उपक्रम वेळापत्रकात समाविष्ट करताना वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना येणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे

१. क्षेत्रभेटीसाठीचा कालावधी फार कमी वाटतो व क्षेत्रभेटीसाठी मानधनही दिले जात नाही.

## सारणी क्र.१५
## वेळापत्रकामध्ये पर्यावरण शिक्षण विषय समाविष्ट करताना पर्यावरण शिक्षकांना येणाऱ्या अन्य समस्या

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.९** | **इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/ एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी वेळापत्रक तयार करताना पर्यावरण शिक्षण विषय वेळापत्रकामध्ये समाविष्ट करताना येणाऱ्या अन्य समस्या कोणत्या?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| १. क्षेत्रभेटीसाठी दररोज बाहेर नेणे अशक्य | ८ | ४७% | ४ | ६७% | ४ | ८०% |
| २. मुळ विषयांचा वेळ विभागतो. | ०० | ०० | २ | ३३% | ०० | ०० |
| ३. वेळापत्रकाची वेळ वाढवावी लागेल. | ४ | २४% | ०० | ०० | ०० | ०० |
| ४. तासिका सकाळच्या सत्रात की दुपारच्या सत्रात बसवाव्यात ही समस्या | ४ | २४% | ०० | ०० | ०० | ०० |
| ५. विद्यार्थी इतर activities मध्ये गुंतलेले असतात. | ०० | ०० | ०० | ०० | २ | ४०% |
| ६. समस्या येत नाहीत. | ४ | २४% | २ | ३३% | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. ४७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी वेळापत्रक तयार करताना त्यामध्ये पर्यावरण विषय समाविष्ट करताना क्षेत्रभेटीसाठी दररोज बाहेर

नेणे अशक्य होते. २४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी वेळापत्रकाची वेळ वाढवावी लागेल. २४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार तासिका सकाळच्या सत्रात बसवाव्या का दुपारच्या सत्रात बसवाव्यात ही समस्या येते. उर्वरित २४% पर्यावरण शिक्षकांना वरील प्रश्नाबाबत समस्या येत नाही.

२. इ.११ वी, १२ वी च्या ६७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी वेळापत्रक तयार करताना पर्यावरण विषय वेळापत्रकात समाविष्ट करताना क्षेत्रभेटीसाठी दररोज बाहेर नेणे अशक्य होते., ३३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार मुळ विषयाचा वेळ विभागतो. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांना वरील प्रश्नाबाबत समस्या येत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बीएस्सीच्या ८०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी वेळापत्रक तयार करताना पर्यावरण विषय वेळापत्रकात समाविष्ट करताना क्षेत्रभेटीसाठी दररोज बाहेर नेणे अशक्य होते. उर्वरित ४०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इतर ॲक्टीव्हीटीज मध्ये विद्यार्थी गुंग असतात. (NCC, NSS)

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वी चे वेळापत्रक तयार करताना त्यामध्ये पर्यावरण शिक्षण हा विषय समाविष्ट करताना येणाऱ्या अन्य समस्या पुढीलप्रमाणे.

   १. क्षेत्रभेटीसाठी विद्यार्थी दररोज बाहेर नेणे अशक्य होते.

   २. वेळापत्रकाची वेळ वाढवावी लागेल.

३. तासिका सकाळच्या सत्रात बसवाव्यात का दुपारच्या सत्रात बसवाव्यात ही समस्या वाटते.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीचे वेळापत्रक तयार करताना त्यामध्ये पर्यावरण शिक्षण हा विषय समाविष्ट करताना येणाऱ्या अन्य समस्या पुढीलप्रमाणे.

१. क्षेत्रभेटीसाठी विद्यार्थी दररोज बाहेर नेणे अशक्य होते.

२. मूळ विषयाचा वेळ विभागतो.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीचे वेळापत्रक तयार करताना त्यामध्ये पर्यावरण शिक्षण हा विषय समाविष्ट करताना येणाऱ्या अन्य समस्या पुढीलप्रमाणे.

१. क्षेत्रभेठीसाठी विद्यार्थी दररोज बाहेर नेणे अशक्य होते.

२. इतर ॲक्टीव्हीटीज्मध्ये विद्यार्थी गुंग असतात.

## सारणी क्र. १६

## पर्यावरण शिक्षण विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचा मूळ विषय

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१०** | **आपल्या शाळेत/महाविद्यालयात पर्यावरण शिक्षण हा विषय कोणत्या विषयाचे शिक्षक शिकवितात.** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| विज्ञान | ६ | ४६% | १ | २५% | १ | ३३% |
| भूगोल | ५ | ३८% | १ | २५% | १ | ३४% |
| विज्ञान/ भूगोल | २ | १६% | ०० | ०० | ०० | ०० |
| पर्यावरणशास्त्र | ०० | ०० | ०० | ०० | १ | ३३% |
| अन्य विषयाचे शिक्षक | ०० | ०० | २ | ५०% | ०० | ०० |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. ४६% शाळांमध्ये इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विज्ञान विषयाचे शिक्षक शिकवितात. ३८% शाळांमध्ये इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय भूगोल विषयाचे शिकवितात. उर्वरित १६% शाळांमधील इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विज्ञान किंवा भूगोल विषयाचे शिक्षक शिकवितात.

२. इ.११वी, १२वीच्या २५% महाविद्यालयांमध्ये इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विज्ञान विषयाचे शिक्षक शिकवितात. २५% महाविद्यालयामध्ये इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय भूगोल विषयाचे शिक्षक शिकवितात उर्वरित ५०% महाविद्यालयामध्ये इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय अन्य विषयाचे शिक्षक शिकवितात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ३३% महाविद्यालयामध्ये एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विज्ञान विषयाचे शिक्षक शिकवितात. ३४% महाविद्यालयामध्ये एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय भूगोल विषयाचे शिक्षक शिकवितात. उर्वरित ३३% महाविद्यालयामध्ये एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय पर्यावरणशास्त्र विषयाचे शिक्षक शिकवितात.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. जवळपास निम्म्या (४६%) शाळांमध्ये इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विज्ञान विषयाचे शिक्षक शिकवितात. अल्प (३८%) शाळांमध्ये इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय भूगोल विषयाचे शिक्षक शिकवितात. उर्वरित अत्यल्प (१६%) शाळांमधील इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विज्ञान किंवा भूगोल विषयाचे शिक्षक शिकवितात.

२. अत्यल्प (२५%) महाविद्यालयांमध्ये इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विज्ञान विषयाचे शिक्षक शिकवितात. अत्यल्प (२५%) महाविद्यालयामध्ये इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय भूगोल विषयाचे शिक्षक शिकवितात. उर्वरित निम्म्या (५०%) महाविद्यालयामध्ये इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय अन्य विषयाचे शिक्षक शिकवितात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या अल्प (३३%) महाविद्यालयामध्ये एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय विज्ञान विषयाचे शिक्षक शिकवितात. अल्प (३४%) महाविद्यालयामध्ये एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय भूगोल विषयाचे शिक्षक शिकवितात. उर्वरित अल्प (३३%) महाविद्यालयामध्ये एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय पर्यावरणशास्त्र विषयाचे शिक्षक शिकवितात.

## सारणी क्र. १७
## पर्यावरण शिक्षण विषय त्यांच्यावर लादला गेला आहे का याबाबतची पर्यावरण शिक्षकांची मते

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.११ | तुम्हास विषय नसताना हा विषय लादला गेला आहे असे वाटते का? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ७ | ४१% | १० | ५९% | ३ | ५०% | ३ | ५०% | १ | २०% | ४ | ८०% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ४१% इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा त्यांचा विषय नसताना तो त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटते. उर्वरित ५९% पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी त्यांना पर्यावरण शिक्षण विषय लादला गेला आहे असे वाटत नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ५०% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा त्यांचा विषय नसताना तो त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटते. उर्वरित ५०% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषय त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २०% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा त्यांचा विषय नसताना तो त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटते. उर्वरित ८०% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषय लादला गेला आहे असे वाटत नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (४१%) शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा त्यांचा विषय नसताना तो त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटते. उर्वरित बहुतांशी (५९%) पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषय त्यांच्यावर लादला गेला असे वाटत नाही.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या निम्म्या (५०%) महाविद्यालयातील शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा त्यांचा विषय नसताना तो त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटते. उर्वरित निम्म्या (५०%) पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषय हा लादला गेला आहे असे वाटत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (२०%) शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा त्यांचा विषय नसताना तो त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटते. उर्वरित बहुतांशी (८०%) पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषय लादला गेला आहे असे वाटत नाही.

## सारणी क्र. १८

## शिक्षकांना त्यांचा विषय नसताना पर्यावरण शिक्षण हा विषय लादला गेला आहे असे वाटते का, याबाबत मुख्याध्यापक/प्राचार्यांची मते.

| मुख्याध्यापक / प्राचार्य प्रश्न क्र.१२ | इ.९वी, १०वी/११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय नसताना लादला गेला आहे असे वाटते का? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये –४ प्राचार्य) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ०० | ०० | १३ | १००% | ३ | ७५% | १ | २५% | ०० | ०० | ३ | १००% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. १००% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, इ. १०वीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटत नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ७५% प्राचार्यांच्या मते इ.११वी, इ.१२वीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय नसताना लादला गेला आहे असे वाटते, उर्वरित २५% प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय त्यांच्यावर लादला गेला आहे, असे वाटत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए. /बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय लादला गेला आहे, असे वाटत नाही.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येते की,

१. सर्व (१००%) मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, इ.१०वीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय लादला गेला आहे असे वाटत नाही.

२. इ.११वी, १२वीच्या बहुतांशी (७५%) प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय नसताना लादला गेला आहे असे वाटते, उर्वरित अत्यल्प (२५%) प्राचार्यांच्या मते इ.११वी, इ.१२वीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय त्यांच्यावर लादला गेला आहे असे वाटत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या सर्व (१००%) प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय लादला गेला आहे असे वाटत नाही.

## सारणी क्र. १९
## पर्यावरण शिक्षण विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा किंवा नाही याबाबतची शिक्षकांची मते

| शिक्षक प्रश्नावली क्र.१२ | इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा असे तुम्हाला वाटते का? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | १४ | ८२% | ३ | १८% | ६ | १००% | ०० | ०० | ५ | १००% | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ८२% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावू नये.

२. इ.११वी, १२वीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (८२%) शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीचा पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा. उर्वरित अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावू नये.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा.

### सारणी क्र. २०
### पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा किंवा नाही याबाबतची मुख्याध्यापक/प्राचार्यांची मते

| **मुख्याध्यापक/प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.१३** | **इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा का?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये–३ प्राचार्य) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ५ | ३८% | ८ | ६२% | ४ | १००% | ०० | ०० | ३ | १००% | ०० | ०० |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. ३८% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणांच्या तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा. उर्वरित ६२% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावू नये.

२. इ.११वी,१२वीच्या १००% प्राचार्यांच्या मते, इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणांच्या तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए. /बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येते की,

१. अल्प (३८%) मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणांच्या तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा. उर्वरित बहुतांशी (६२%) मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावू नये.

२. कनिष्ट महाविदयालयांच्या सर्व (१००%) प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा.

३. वरिष्ट महाविदयालयांच्या सर्व (१००%) प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण तासिकांचा विचार करता पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा.

## सारणी क्र. २१
## पर्यावरण शिक्षण विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा असे पर्यावरण शिक्षकांना का वाटते?

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१३** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा असे तुम्हाला का वाटते?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| पर्यावरण शिक्षणाविषयी विस्तृत माहिती देणेसाठी उद्‌दिष्ट गाठणेसाठी | १० | ५९% | ५ | ८३% | १ | २०% |
| अन्य विषयाचे शिक्षक अध्यापन करताना पर्यावरण शिक्षणाला पुरेसे महत्व देत नाहीत. | २ | १२% | ०० | ०० | २ | ४०% |
| इतर विषयांच्या शिक्षकांना त्यांच्या विषयातून तासिका मिळत नाहीत. | ३ | १८% | ०० | ०० | १ | २०% |
| क्षेत्रभेट व प्रकल्पाकडे दुर्लक्ष होते त्याचे नियोजन स्वतंत्रपणे करण्यासाठी | २ | १२% | १ | १७% | २ | ४०% |
| मत व्यक्त न करणारे | २ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ५९% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणाविषयी पूर्ण ज्ञान, माहिती देणेसाठी व उद्‌दिष्ट गाठणेसाठी पूर्ण वेळ पर्यावरण शिक्षक नेमावा. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते अन्य विषयाचे शिक्षक अध्यापन करताना पर्यावरण शिक्षणाला कमी महत्व देतात त्यामुळे पर्यावरण शिक्षक पूर्ण

वेळ नेमावा. १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते इतर विषयांच्या शिक्षकांना त्यांच्या विषयातून तासिका मिळत नाहीत त्यामुळे पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते क्षेत्रभेट व प्रकल्पाकडे दुर्लक्ष होते व त्याचे नियोजन स्वतंत्रपणे करण्यासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षकांनी वरील प्रश्नाबाबत आपले मत व्यक्त केले नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ८३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा कारण पर्यावरण शिक्षण या विषयाबद्दल विस्तृत माहिती देणेसाठी व उद्दिष्ट गाठणे साठी, उर्वरित १७% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणासाठी इ.११वी, १२वीसाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा कारण क्षेत्रभेट व प्रकल्पाकडे दुर्लक्ष होते व त्याचे नियोजन स्वतंत्रपणे करण्यासाठी.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २०% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा कारण पर्यावरण शिक्षण विषयाबद्दल विस्तृत माहिती देणेसाठी व उद्दिष्ट गाठणेसाठी ४०% पर्यावरण शिक्षकांच्या मते अन्य विषयाचे शिक्षक अध्यापन करताना पर्यावरण शिक्षणाला कमी महत्व देतात त्यामुळे पर्यावरण शिक्षक पूर्ण वेळ नेमावा. २०% पर्यावरण शिक्षकाच्या मते इतर विषयाच्या शिक्षकांना त्यांच्या विषयातून तासिका मिळत नाही म्हणून पूर्ण वेळ शिक्षक नेमावा. उर्वरित ४०% पर्यावरण शिक्षकांच्या मते क्षेत्रभेट व प्रकल्पाकडे दुर्लक्ष होते व त्यांचे नियोजन स्वतंत्रपणे करण्यासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा याचे समर्थन इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षकांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

   १. पर्यावरण शिक्षणाविषयी पूर्ण ज्ञान, माहिती देणेसाठी व उद्दिष्ट गाठणेसाठी पूर्ण वेळ पर्यावरण शिक्षकांची गरज आहे.

   २. अन्य विषयाचे शिक्षक अध्यापन करताना पर्यावरण शिक्षणाला कमी महत्व देतात.

   ३. इतर विषयांच्या शिक्षकांना त्यांच्या विषयातून पर्यावरण शिक्षणासाठी तासिका मिळत नाहीत.

   ४. क्षेत्रभेट व प्रकल्पाकडे दुर्लक्ष होते. त्यांचे नियोजन स्वतंत्रपणे करण्यासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा.

२. इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा याचे समर्थन इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांनी पुढीलप्रमाणे केले.

   १. पर्यावरण शिक्षणाविषयी पूर्ण ज्ञान, माहिती देणेसाठी, व उद्दिष्ट गाठणेसाठी पूर्ण वेळ पर्यावरण शिक्षकाची गरज आहे.

   २. क्षेत्रभेट व प्रकल्पाकडे दुर्लक्ष होते त्यांचे नियोजन स्वतंत्रपणे करण्यासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण विषयासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमला जावा याचे समर्थन एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांनी पुढीलप्रमाणे केले.

   १. पर्यावरण शिक्षणाविषयी पूर्ण ज्ञान, माहिती देणेसाठी व उद्दिष्ट गाठणेसाठी पूर्ण वेळ पर्यावरण शिक्षकाची गरज आहे.

२. अन्य विषयाचे शिक्षक अध्यापन करताना पर्यावरण शिक्षणाला कमी महत्व देतात.

३. इतर विषयांच्या शिक्षकांना त्यांच्या विषयातून पर्यावरण शिक्षणासाठी तासिका मिळत नाहीत.

४. क्षेत्रभेट व प्रकल्पाकडे दुर्लक्ष होते त्यांचे नियोजन स्वतंत्रपणे करण्यासाठी पूर्ण वेळ शिक्षक नेमावा.

## सारणी क्र. २२
## पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या नेमणूकी संदर्भात पर्यावरण शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्या

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१४ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाच्या शिक्षकांच्या नेमणूकी संदर्भात जाणवणाऱ्या समस्या कृपया थोडक्यात लिहा. | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| शासन या शिक्षकांची नेमणूक नियमाप्रमाणे करीत नाही. | ४ | २४% | ०० | ०० | ०० | ०० |
| विषयाची आवड नसते, इतर विषयाएवढे महत्व वाटत नाही तरीही अध्यापनास हा विषय दिला जातो. | २ | १२% | २ | ३३% | ०० | ०० |
| विस्तृत ज्ञान व माहिती शिक्षकांना नसते. | ४ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |
| तासिका कमी त्यामुळे पर्यावरण शिक्षक नेमला जात नाही. | २ | १२% | २ | ३३% | ०० | ०० |
| अशा शिक्षकांना त्वरित मान्यता मिळत नाही. | ४ | २४% | २ | ३३% | ०० | ०० |
| पर्यावरण शास्त्र सेट (SET) नेट (NET) पदव्युत्तर शिक्षण घेतलेले शिक्षक मिळत नाहीत. | ०० | ०० | ०० | ०० | २ | ४०% |
| अभ्यासक्रम कोर्टाच्या आदेशानुसार उरकण्यात येतो. | ०० | ०० | ०० | ०० | २ | ४०% |
| मत व्यक्त न केलेले शिक्षक | ४ | २४% | २ | ३३% | १ | २०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. २४% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाच्या शिक्षकांच्या नेमणूकी संदर्भात जाणवणारी समस्या म्हणजे शासन या शिक्षकांची नेमणूक नियमाप्रमाणे करत नाही. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षकांना विषयाचे तेवढे महत्व वाटत नाही. आणि विषयाची आवड पण नसते. तरीही अध्यापनास हा विषय दिला जातो. २३% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षण हा विषय घेणाऱ्या शिक्षकाकडे पर्यावरण शिक्षण या विषयाविषयी विस्तृत व पुरेसे ज्ञान व माहिती नसते. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका कमी त्यामुळे पर्यावरण शिक्षक नेमला जात नाही. २४% पर्यावरण शिक्षकांच्या मते अशा पर्यावरण शिक्षकांना त्वरित मान्यता मिळत नाही. उर्वरित २४% शिक्षकांनी वरील प्रश्नाबाबत आपले मत व्यक्त केले नाही.

२. इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाच्या शिक्षकाच्या नेमणूकीसंदर्भात जाणवणारी समस्या म्हणजे ३३% पर्यावरण शिक्षकांच्या मते त्यांना पर्यावरण विषयाची आवड नसते व इतर विषयाएवढे पर्यावरण शिक्षण विषयाबद्दल महत्व वाटत नाही तरीही त्यांना हा विषय शिकवायला दिला जातो. ३३% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका कमी त्यामुळे पर्यावरण शिक्षक नेमला जात नाही. ३३% पर्यावरण शिक्षकांच्या मते अशा पर्यावरण शिक्षकांना त्वरीत मान्यता मिळत नाही. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षक वरील प्रश्नाबाबत आपले मत व्यक्त करत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ४०% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाच्या नेमणूकी संदर्भात जाणवणारी समस्या म्हणजे सेट/नेट व पदव्युत्तर शिक्षण घेतलेले शिक्षक मिळत नाहीत. ४०% पर्यावरण शिक्षकांच्या मते अभ्यासक्रम कोर्टाच्या आदेशानुसार उरकला जातो. उर्वरित २०% पर्यावरण शिक्षक वरील प्रश्नाबाबत आपले मत व्यक्त करत नाहीत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकाच्या नेमणूकीसंदर्भात पुढील समस्या येतात.

अ. शासन शिक्षकांची नेमणूक नियमाप्रमाणे करत नाही.

ब. शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाबद्दल तेवढे महत्व वाटत नाही. तसेच विषयाची आवड नसते.

क. पर्यावरण शास्त्र विषयाचा स्वतंत्र शिक्षक नेमला जात नाही.

ड. पर्यावरण शिक्षकाकडे विस्तृत व पुरेसे ज्ञान नसताना नेमणूक केली जाते.

इ. पर्यावरण शिक्षणाच्या तासिका कमी त्यामुळे पर्यावरण शिक्षक नेमला जात नाही.

फ. पर्यावरण शिक्षणासाठी नेमलेल्या शिक्षकाला त्वरीत मान्यता मिळत नाही.

२. इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या नेमणूकीसंदर्भात पुढील समस्या येतात.

अ. पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाबद्दल आवड नाही व इतर विषयाएवढे महत्व वाटत नाही तरीही त्यांची नेमणूक केली जाते.

ब. विद्यार्थी संख्या जास्त, क्षेत्रभेट व प्रकल्प तासिका अपुऱ्या असतात.

क. पर्यावरण शिक्षणासाठी नेमलेल्या शिक्षकाला त्वरीत मान्यता मिळत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या नेमणूकीसंदर्भात पुढील समस्या येतात.

अ. पर्यावरण शिक्षण विषय शिकविण्यासाठी सेट, नेट, परीक्षा उत्तीर्ण आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले शिक्षक मिळत नाहीत.

ब. अभ्यासक्रम कोर्टाच्या आदेशानुसार उरकला जातो.

**सारणी क्र. २३**

**पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकीसंदर्भात मुख्याध्यापकांना/प्राचार्यांना जाणवणाऱ्या समस्या.**

| **मुख्याध्यापक/प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.१४** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाच्या शिक्षकांच्या नेमणूकीसंदर्भात जाणवणाऱ्या समस्या कोणत्या?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | **इ.९वी, १०वी (१३ शाळा - १३ मुख्याध्यापक)** | | **इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये - ४ प्राचार्य)** | | **एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये - ३ प्राचार्य)** | |
| | **संख्या** | **टक्के** | **संख्या** | **टक्के** | **संख्या** | **टक्के** |
| तासिका कमी असल्याने पूर्ण वेळ शिक्षक नेमता येत नाही. | ४ | ३१% | ०० | ०० | ०० | ०० |
| पर्यावरण शास्त्र पदवीधारक शिक्षक उपलब्ध नाहीत. | ८ | ६२% | ४ | १००% | ३ | १००% |
| प्रतिसाद नाही. | ३ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. इ.९वी, १०वीच्या ३१% शाळातील मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी शिक्षक नेमणुकीसंदर्भात पर्यावरण शिक्षण या विषयासाठी तासिका कमी असल्याने पूर्ण वेळ शिक्षक नेमता येत नाही. ६२% शाळांतील मुख्याध्यापकांच्या

मते पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पर्यावरणशास्त्र विषयाचे पदवीधारक शिक्षक उपलब्ध नाहीत. उर्वरित २३% मुख्याध्यापकांनी पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणुकीसंदर्भातील समस्याबाबत प्रतिसाद दर्शविला नाही.

२. इ.११वी, १२वीच्या १००% महाविद्यालयातील इ.११वी, १२वीसाठी शिक्षक नेमणुकीसंदर्भात पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पर्यावरणशास्त्र विषयाचे पदवीधारक शिक्षक उपलब्ध होत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी १००% महाविद्यालयातील प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शिक्षक नेमणूकीसंदर्भात पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पर्यावरणशास्त्र विषयाचे पदवीधारक शिक्षक उपलब्ध होत नाहीत.

**अर्थनिर्वचन**

यावरुन असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकी संदर्भात मुख्याध्यापकांना जाणवणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे.

    १. पर्यावरण शिक्षण विषयासाठी तासिका कमी असल्याने पूर्ण वेळ शिक्षक नेमता येत नाही.

    २. पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पर्यावरणशास्त्र विषयाचे पदवीधारक शिक्षक उपलब्ध होत नाहीत.

२. इ.११वी, इ.१२वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकीसंदर्भात प्राचार्यांना जाणवणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे.

    १. पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पर्यावरणशास्त्र विषयाचे पदवीधारक व शिक्षक उपलब्ध होत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./एस.वाय.बी.कॉम./एस.वाय.बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकीसंदर्भात प्राचार्यांना जाणवणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे.

१. पर्यावरण शिक्षण या विषयासाठी पर्यावरणशास्त्र विषयाचे पदवीधारक शिक्षक उपलब्ध होत नाहीत.

## सारणी क्र. २४

## पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकी संदर्भात जाणवणाऱ्या समस्यांवर मुख्याध्यापक/प्राचार्यांनी शोधलेले उपाय

| **मुख्याध्यापक/ प्राचार्य प्रश्नावली प्रश्न १५** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाच्या शिक्षकांच्या नेमणूकीसंदर्भात जाणवणाऱ्या समस्यावर आपण कशी मात करता?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| उपलब्ध शिक्षकांना प्रशिक्षण देणे. | १३ | १००% | ४ | १००% | ३ | १००% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. १००% मुख्याध्यापक इ.९वी १०वीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकीच्या संदर्भात जाणवणाऱ्या समस्यांचे निवारण उपलब्ध शिक्षकांना प्रशिक्षण देवून करतात.

२. १००% प्राचार्य इ.११वी १२वीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकीसंदर्भात जाणवणाऱ्या समस्यांचे निवारण उपलब्ध शिक्षकांना प्रशिक्षण देवून करतात.

३. १००% प्राचार्य एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणुकीसंदर्भात जाणवणाऱ्या समस्यांचे निवारण उपलब्ध शिक्षकांना प्रशिक्षण देवून करतात.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की

१. सर्व (१००%) मुख्याध्यापक इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकीच्या संदर्भात जाणवणाऱ्या समस्यांचे निवारण उपलब्ध शिक्षकांना प्रशिक्षण देवून करतात.

२. कनिष्ट महाविदयालयांचे सर्व (१००%) प्राचार्य इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकीसंदर्भात जाणवणाऱ्या समस्यांचे निवारण उपलब्ध शिक्षकांना प्रशिक्षण देवून करतात.

३. वरिष्ट महाविदयालयांचे सर्व (१००%) प्राचार्य एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयासाठी शिक्षक नेमणूकीसंदर्भात जाणवणाऱ्या समस्यांचे निवारण उपलब्ध शिक्षकांना प्रशिक्षण देवून करतात.

**सारणी क्र. २५**

**पर्यावरण शिक्षकांसाठीच्या प्रशिक्षणाबाबत पर्यावरण शिक्षकांनी दिलेली माहिती**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१५** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जाते काय?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | १६ | ९४% | १ | ६% | १ | १७% | ५ | ८३% | १ | २०% | ४ | ८०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ९४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित ६% पर्यावरण शिक्षकांनी इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही असे सांगितले.

२. इ.११वी, १२वीच्या १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित ८३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्या-नुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित ८०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येईल की,

१. बहुतांशी (९४%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. इ.९वी, १०वी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. हे ६% शिक्षकांना माहीत नाही.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण विषय शिकवणाऱ्या बहुतांशी (८३%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही. मात्र उर्वरित अत्यल्प (१७%) पर्यावरण शिक्षक असे सांगतात की असे प्रशिक्षण दिले जाते.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (८०%) शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही. मात्र उर्वरित अत्यल्प (२०%) पर्यावरण शिक्षक सांगतात की असे प्रशिक्षण दिले जाते.

## सारणी क्र. २६
## पर्यावरण शिक्षकांसाठीच्या प्रशिक्षणाबाबत मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी दिलेली माहिती.

| मुख्याध्यापक/प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र. १६ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बीए/बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण दिले जाते काय? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ९ | ६९% | ४ | ३१% | २ | ५०% | २ | ५०% | २ | ६७% | १ | ३३% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ६९% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित ३१%

मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही.

२. ५०% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित ५०% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही.

३. ६७% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित ३३% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीच्या बहुतांशी (६९%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित अल्प (३१%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही.

२. कनिष्ठ महाविदयालयांच्या निम्म्या (५०%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित निम्म्या (५०%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

३. वरिष्ठ महाविदयालयांच्या बहुतांशी (६७%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. उर्वरित अल्प (३३%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण दिले जात नाही.

**सारणी क्र. २७**

**पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण देणाऱ्या व्यवस्था**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१६** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षकां साठी प्रशिक्षण दिले जात असेल तर असे प्रशिक्षण कोण देते?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | **इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक)** | | **इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक)** | | **एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक)** | |
| | **संख्या** | **टक्के** | **संख्या** | **टक्के** | **संख्या** | **टक्के** |
| शासन | १६ | ९४% | ५ | ८३% | ०० | ०० |
| शिवाजी विद्यापीठ | ०० | ०० | ०० | ०० | १ | २०% |
| माहित नाही | ४ | २४% | २ | ३४% | ४ | ८०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की

१. इ.९वी, १०वीच्या ९४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण शासन देते. उर्वरित २४% पर्यावरण शिक्षकांना असे प्रशिक्षण कोण देते ते माहित नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ८३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण शासन देते. उर्वरित ३४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या

पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण कोण देते याबाबत त्यांना माहिती नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण विद्यापीठाकडून दिले जाते मात्र उर्वरित ८०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी साठी पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण कोण देते याबाबत माहिती नाही. प्रशिक्षणाबाबत निघालेले नोटीफिकेशन त्यांना मिळालेले नाही

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येईल की,

१. बहुतांशी (९४%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण शासन देते. उर्वरित अत्यल्प (२४%) पर्यावरण शिक्षकांना असे प्रशिक्षण कोण देते ते माहीत नाही.

२. बहुतांशी (८३%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण शासन देते. उर्वरित अल्प (३४%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण कोण देते याबाबत त्यांना माहिती नाही.

३. अत्यल्प (२०%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम. /बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण विद्यापीठाकडून दिले जाते. मात्र उर्वरित बहुतांशी (८०%) पर्यावरण शिक्षकांच्या

सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण कोण देते याबाबत माहिती नाही. प्रशिक्षणाबाबत निघालेले नोटीफिकेशन त्यांना मिळालेले नाही.

## सारणी क्र. २८
## पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण देणाऱ्या व्यवस्थांबाबत मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी दिलेली माहिती

| मुख्याध्यापक/प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.१७ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी यांच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयाचे प्रशिक्षण कोण देते? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा - १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये — ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये — ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| शासन | १३ | १००% | २ | ५०% | १ | ३३% |
| खाजगी संस्था | ०० | ०० | १ | २५% | ०० | ०० |
| विद्यापीठ | ०० | ०० | ०० | ०० | २ | ६७% |
| माहित नाही | ०० | ०० | १ | २५% | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. १००% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण शासन देते.

२. ५०% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठीच्या शिक्षकांना पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण शासन देते. २५% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण खाजगी संस्था देते. उर्वरित २५% महाविद्यालयातील प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या शिक्षकांनी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण कोण देते हे माहित नाही.

३. ३३% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण शासन देते. उर्वरित ६७% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण विद्यापीठ देते.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. सर्व (१००%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण शासन देते.

२. कनिष्ठ महाविदयालयांच्या निम्म्या (५०%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण शासन देते. अत्यल्प (२५%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या शिक्षकांना पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण खाजगी संस्था देते. उर्वरित अत्यल्प (२५%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या शिक्षकांनी पर्यावरण विषयाचे प्रशिक्षण कोण देते हे माहित नाही.

३. वरिष्ठ महाविदयालयांच्या अल्प (३३%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण शासन देते. उर्वरित बहुतांशी (६७%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण विद्यापीठ देते.

## सारणी क्र. २९

## पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेलेल्या शिक्षकांचे प्रमाण

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१७** | **इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी आपल्या शाळेतून/महाविद्यालयातून पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी तुम्ही गेला होता काय?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | १२ | ७०% | ५ | ३०% | ०० | ०० | ६ | १००% | १ | २०% | ४ | ८०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षकांपैकी ७०% पर्यावरण शिक्षक आपल्या शाळेतून पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेले होते. उर्वरित ३०% पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेलेले नाहीत.

२. इ.११वी, १२वीचे १००% पर्यावरण शिक्षक इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेले नाहीत.

३. २०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी ते आपल्या महाविद्यालयातून पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेले होते. उर्वरित ८०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी ते आपल्या महाविद्यालयातून पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेले नाहीत.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकवणारे बहुतांशी (७०%) पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेले होते. उर्वरित अत्यल्प (३०%) पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेलेले नाहीत.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या शिक्षकांपैकी कोणीही शिक्षक इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेलेले नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे अत्यल्प (२०%) पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेले होते. उर्वरित बहुतांशी (८०%) पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेलेले नाहीत.

### सारणी क्र. ३०
### पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेलेले शिक्षक कोणत्या विषयाचे होते?

| **मुख्याध्यापक/प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.१९** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी गेलेले शिक्षक कोणत्या विषयाचे होते?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | एस.वाय. बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| भूगोल व विज्ञान | ५ | ३८% | २ | ५०% | ०० | ०० |
| विज्ञान | ३ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |
| भूगोल | १ | ८% | १ | २५% | ०० | ०० |
| प्रशिक्षणास गेले नाहीत. | ४ | ३१% | १ | २५% | ३ | १००% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ३८% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी, शाळेतून गेलेले शिक्षक भूगोल व विज्ञान विषयाचे होते. उर्वरित २३% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी शाळेतून गेलेले शिक्षक विज्ञान विषयाचे होते. उर्वरित ८% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी शाळेतून गेलेले शिक्षक भूगोल विषयाचे होते. उर्वरित ३१% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी शाळेतून कोणतेही शिक्षक गेले नाहीत.

२. ५०% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून गेलेले शिक्षक भूगोल व विज्ञान या विषयाचे होते. उर्वरित २५% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून गेलेले शिक्षक भूगोल विषयाचे होते. उर्वरित २५% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून कोणतेही शिक्षक गेले नाहीत.

३. १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून कोणतेही शिक्षक गेले नाहीत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. अल्प (३८%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी शाळेतून गेलेले शिक्षक भूगोल व विज्ञान विषयाचे होते. उर्वरित अत्यल्प (२३%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी शाळेतून गेलेले शिक्षक विज्ञान विषयाचे होते. उर्वरित अत्यल्प (८%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी शाळेतून गेलेले शिक्षक भूगोल विषयाचे होते. उर्वरित अल्प (३१%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी शाळेतून कोणतेही शिक्षक गेले नाहीत.

२. कनिष्ट महाविदयालयांकडील निम्म्या (५०%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार कनिष्ठ महाविदयालयांकडील इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून गेलेले शिक्षक भूगोल व विज्ञान या विषयाचे होते. उर्वरित अत्यल्प (२५%) महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून गेलेले शिक्षक भूगोल विषयाचे होते. उर्वरित अत्यल्प (२५%) प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून कोणतेही शिक्षक गेले नाहीत.

३. वरिष्ठ महाविदयालयाकडील सर्व (१००%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयातून कोणतेही शिक्षक गेले नाहीत.

## सारणी क्र. ३१

## शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले आहेत किंवा नाहीत याबाबत पर्यावरण शिक्षकांनी दिलेली माहिती.

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१९** | **इ.९वी, १०वी/ इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम तयार केले आहेत का?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ९ | ५३% | ८ | ४७% | ०० | ०० | ६ | १००% | ३ | ६०% | २ | ४०% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ५३% शाळांमधील पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले आहेत. उर्वरित ४७% शाळांमधील पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले नाहीत.

२. इयत्ता ११वी, १२वीच्या १००% महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षकांसाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ६०% महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले आहेत. उर्वरित ४०% महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम.

/बी.एस्सीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले नाहीत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या जवळपास निम्म्या (५३%) शाळांमधील पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले आहेत. उर्वरित जवळपास निम्म्या (४७%) शाळांतील शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले नाहीत.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षकासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (६०%) महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले आहेत. उर्वरित अल्प (४०%) महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी ठोस प्रशिक्षण कार्यक्रम केलेले नाहीत.

## सारणी क्र. ३२

## शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी तयार केलेले कार्यक्रम व त्यांचे स्वरूप.

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२० | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी तयार केलेले कार्यक्रम व त्यांचे स्वरूप कसे आहे? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| एक आठवडा निवासी प्रशिक्षण | ४ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |
| कृतीसत्र : व्याख्याने | ४ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वशिक्षण अभियान प्रशिक्षण वर्ग (शासनातर्फे) | २ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |
| विद्यापीठ आयोजनानुसार | ०० | ०c | ०० | ०० | २ | ४०% |
| प्रतिसाद नाही | ९ | ५३% | ६ | १००% | ४ | ८०% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे म्हणता येते की,

१. २३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी, तयार केलेला कार्यक्रम म्हणजे एक आठवडा निवासी शिबीर. उर्वरित २३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार कृतीसत्र व व्याख्यान आयोजित केली जातात. उर्वरित १२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार सर्व शिक्षण अभियान प्रशिक्षण वर्ग शासनातर्फे आयोजित केले जातात. उर्वरित ५३% पर्यावरण शिक्षकांनी इ.९वी, १०वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी तयार केलेले कार्यक्रम व त्याचे स्वरूप कोणते याबाबत माहिती नाही.

२. इ.११वी, १२वीच्या १००% पर्यावरण शिक्षकांनी इ.११वी, १२वीच्या शिक्षकांसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी तयार केलेले प्रशिक्षण कार्यक्रम व त्यांचे स्वरूप कोणते याबाबत माहिती नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ४०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणविषयक कार्यक्रम विद्यापीठ आयोजनानुसार आखतात. उर्वरित ८०% पर्यावरण शिक्षकांनी एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या शिक्षकांसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी तयार केलेले प्रशिक्षण कार्यक्रम व त्यांचे स्वरूप कोणते या प्रश्नाबाबत त्यांनामाहिती नाही.

## अर्थनिर्वचन

यावरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (२३%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी तयार केलेले कार्यक्रम म्हणजे आठवडा निवासी शिबीर अत्यल्प (१२%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार सर्व शिक्षण अभियान प्रशिक्षण वर्ग शासनातर्फे आयोजित केले जातात. उर्वरित बहुतांशी (५३%) पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी तयार केलेले कार्यक्रम व त्याचे स्वरूप कोणते, याबाबत माहिती नाही.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांना इ.११वी, १२वीसाठी शासनाने पर्यावरण शिक्षणासाठी तयार केलेले कार्यक्रम व त्यांचे स्वरूप कोणते याबाबत माहिती नाही.

३. अल्प (४०%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणविषयक प्रशिक्षण कार्यक्रम विद्यापीठ आयोजनानुसार आखले जातात. उर्वरित बहुतांशी (८०%) पर्यावरण शिक्षकांना एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या शिक्षकांसाठी शासनाने पर्यावरण

शिक्षणासाठी तयार केलेले कार्यक्रम व त्यांचे स्वरूप कोणते याबाबत माहिती नाही.

**सारणी क्र. ३३**
**प्रशिक्षणानंतर पर्यावरणविषयक उपक्रम किती प्रमाणात राबवले जातात याबाबत पर्यावरण शिक्षकांची मते.**

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.१८ | प्रशिक्षणाव्दारे ज्यांचे ज्ञान मिळाले असे उपक्रम प्रशिक्षणा नंतर किती प्रमाणात राबवले जातात? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| पुरेशा प्रमाणात | ७ | ४१% | ०० | ०० | ०० | ०० |
| कमी प्रमाणात | ७ | ४१% | १ | १७% | १ | २०% |
| प्रतिसाद नाही | ३ | १८% | ५ | ८३% | ४ | ८०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ४१% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाव्दारे घेतलेले सर्व उपक्रम पुरेशा प्रमाणात राबवतात. उर्वरित ४१% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाव्दारे घेतलेले सर्व उपक्रम कमी प्रमाणात राबवतात. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण केले नसल्याने त्यांनी त्याबाबत आपला प्रतिसाद दाखविला नाही.

२. इ.११वी, १२वीच्या १७% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाव्दारे घेतलेले सर्व उपक्रम कमी प्रमाणात राबवतात. उर्वरित ८३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण

विषयाचे प्रशिक्षण केले नसल्याने त्यांनी त्याबाबत आपला प्रतिसाद दाखविला नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २०% पर्यावरण शिक्षण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाव्दारे घेतलेले सर्व उपक्रम पुरेशा प्रमाणात राबवतात. उर्वरित ८०% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण केले नसल्याने त्यांनी त्याबाबत आपला प्रतिसाद दाखविला नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (४१%) शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाव्दारे घेतलेले सर्व उपक्रम पुरेशा प्रमाणात राबवतात. उर्वरित अल्प (४१%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाव्दारे घेतलेले सर्व उपक्रम कमी प्रमाणात राबवतात. उर्वरित अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण केले नसल्याने त्यांनी त्याबाबत आपला प्रतिसाद दाखविला नाही.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (१७%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाव्दारे घेतलेले सर्व उपक्रम कमी प्रमाणात राबवतात०. उर्वरित बहुतांशी (८३%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण केले नसल्याने त्यांनी त्याबाबत आपला प्रतिसाद दाखविला नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (२०%) पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाव्दारे घेतलेले सर्व उपक्रम पुरेशा प्रमाणात राबवले जातात. उर्वरित बहुतांशी (८०%) पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे प्रशिक्षण केले नसल्याने त्यांनी त्याबाबत आपला प्रतिसाद दाखविला नाही.

### सारणी क्र. ३४
### पर्यावरण शिक्षण विषयाच्या प्रशिक्षणाबाबत पर्यावरण शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्या

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२१** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत जाणवणाऱ्या समस्या कोणत्या?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम. /बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| प्रशिक्षण कालावधी कमी | ४ | २३% | ०० | ०० | २ | ४०% |
| प्रशिक्षणात सलगता नाही | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |
| प्रशिक्षणासाठी तज्ञ शिक्षक नाहीत | ५ | २९% | ०० | ०० | ०० | ०० |
| समस्या नाहीत | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |
| प्रतिसाद नाही | ३ | १८% | ६ | १००% | ३ | ६०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या शाळांमधील २३% शाळांमधील पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वी मधील पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत जाणवणारी प्रमुख समस्या म्हणजे प्रशिक्षणाचा कालावधी कमी आहे. १८%

पर्यावरण शिक्षकांच्या मते प्रशिक्षणामध्ये सलगता नाही. उर्वरित २९% पर्यावरण शिक्षकांच्या मते प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ शिक्षक नाहीत. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षकांना प्रशिक्षणाबाबत समस्या जाणवल्या नाहीत. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षकांनी इ.९वी व १०वीमधील पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत जाणवणाऱ्या समस्या कोणत्या या प्रश्नाबद्दल प्रतिसाद दिला नाही.

२. इ.११वी, १२वीच्या १००% पर्यावरण शिक्षकांनी इ.११वी व १२वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत कोणत्या समस्या येतात याबद्दल माहिती नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ४०% महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा कालावधी खूपच कमी आहे असे जाणवते. उर्वरित ६०% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत कोणत्या समस्या आल्या याबद्दल शिक्षकांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरुन असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत जाणवणाऱ्या इतर समस्या पुढीलप्रमाणे –

   १. पर्यावरण शिक्षण प्रशिक्षणाचा कालावधी कमी आहे.

   २. प्रशिक्षणामध्ये सलगता नाही.

   ३. प्रशिक्षणासाठी तज्ज्ञ शिक्षक नाहीत.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) महाविद्यालयातील पर्यावरण शिक्षकांना इ.११वी व इ.१२वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयांच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत कोणत्या समस्या येतात याबद्दल माहिती नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण विषयांच्या शिक्षकांच्या प्रशिक्षणाबाबत जाणवणाऱ्या इतर समस्या पुढीलप्रमाणे.

१. प्रशिक्षणाचा कालावधी खूपच कमी वाटतो.

**सारणी क्र. ३५**

**पर्यावरण शिक्षण हा विषय अध्यापनासाठी का निवडला याबाबतची पर्यावरण शिक्षकांची मते.**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२२** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण विषयाच्या शिक्षकांनी पर्यावरण शिक्षण हा विषय अध्यापनासाठी कसा निवडला?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| आवड आहे म्हणून | ७ | ४१% | ३ | ५०% | २ | ४०% |
| मुख्याध्यापकांच्या सूचनेनुसार | १२ | ७०% | ४ | ६७% | ०० | ०० |
| पदवी स्तरावर विषय होता म्हणून | ०० | ०० | ०० | ०० | ३ | ६०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ४१% पर्यावरण शिक्षकांनी अध्यापनासाठी पर्यावरण शिक्षण हा विषय आवड आहे म्हणून निवडला, तर उर्वरित ७०% पर्यावरण शिक्षकांनी पर्यावरण शिक्षण हा विषय मुख्याध्यापकांच्या सूचनेनुसार निवडला.

२. इ.११वी, १२वीच्या ५०% पर्यावरण शिक्षकांनी अध्यापनासाठी पर्यावरण शिक्षण हा विषय आवड आहे म्हणून निवडला, तर उर्वरित ६७% पर्यावरण शिक्षकांनी इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय प्राचार्यांच्या सूचनेनुसार निवडला.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ४०% पर्यावरण शिक्षकांनी अध्यापना-साठी पर्यावरण शिक्षण हा विषय आवड आहे म्हणून निवडला. तर ६०% शिक्षकांनी पर्यावरण शिक्षण हा विषय प्राचार्यांच्या सूचनेनुसार निवडला.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (४१%) पर्यावरण शिक्षकांनी अध्यापनासाठी पर्यावरण शिक्षण हा विषय आवड आहे म्हणून निवडला. तर बहुतांशी (७०%) शिक्षकांनी पर्यावरण शिक्षण हा विषय मुख्याध्यापकांच्या सूचनेनुसार निवडला.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या निम्म्या (५०%) पर्यावरण शिक्षकांनी अध्यापनासाठी पर्यावरण शिक्षण हा विषय आवड आहे म्हणून निवडला. उर्वरित बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांनी अध्यापनासाठी पर्यावरण शिक्षण हा विषय प्राचार्यांच्या सूचनेनुसार निवडला.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (४०%) पर्यावरण शिक्षकांनी पर्यावरण शिक्षण हा विषय आवड आहे म्हणून निवडला. उर्वरित बहुतांशी (६०%) पर्यावरण शिक्षकांनी पर्यावरण शिक्षण हा विषय प्राचार्यांच्या सूचनेनुसार निवडला.

## सारणी क्र. ३६
## पर्यावरण शिक्षकांसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाच्या पुस्तकांची उपलब्धता

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२३** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी त्यांच्या संस्थेच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत का?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| होय | १२ | ७१% | ५ | ८३% | ५ | १००% |
| केवळ हस्तपुस्तिका आहेत | ५ | २९% | १ | १७% | ०० | ०० |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ७१% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत. उर्वरित २९% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या केवळ हस्तपुस्तिका उपलब्ध आहेत.

२. इ.११वी, १२वीच्या ८३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी त्यांच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत. १७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी त्यांच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या केवळ हस्तपुस्तिका उपलब्ध आहेत.

३. १००% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी त्यांच्या संस्थेच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीच्या बहुतांशी (७१%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत. उर्वरित अत्यल्प (२९%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या केवळ हस्तपुस्तिका उपलब्ध आहेत.

२. इ.११वी, १२वीच्या बहुतांशी (८३%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी त्यांच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत. उर्वरित अत्यल्प (१७%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी त्यांच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण विषयाच्या केवळ हस्तपुस्तिका उपलब्ध आहेत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी त्यांच्या संस्थेच्या ग्रंथालयात पर्यावरण शिक्षण या विषयाची पुस्तके उपलब्ध आहेत.

## सारणी क्र. ३७
## शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२४** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे का?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ८ | ४७% | ९ | ५३% | ४ | ६७% | २ | ३३% | ५ | १००% | ०० | ०० |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इयत्ता ९वी, १०वीच्या ४७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे. उर्वरित ५३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ६७% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता नाही.

३. १००% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या जवळपास निम्म्या (४७%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे. उर्वरित जवळपास निम्म्या (५३%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता नाही.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे. उर्वरित अल्प (३३%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय. बी.ए./बी.कॉम. /बी.एस्सीसाठी त्यांच्या शैक्षणिक संस्थेमध्ये पर्यावरण शिक्षण देण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता आहे.

## सारणी क्र. ३८
## पर्यावरण शिक्षण देण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या साधनांबाबत शिक्षकांनी दिलेली माहिती.

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२५ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी कोणती साधने उपलब्ध आहेत? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| कृतीपुस्तिका, प्रकल्प पुस्तके | २ | २४% | ०० | ०० | २ | ४०% |
| संगणक, इंटरनेट व ग्रंथालयातील संदर्भग्रंथ | ६ | ३५% | ०० | ०० | ३ | ६०% |
| नकाशे, भित्तीपत्रके व जीवशास्त्र प्रयोगशाळा | २ | १२% | ३ | ५०% | ०० | ०० |
| साधने उपलब्ध नाहीत. | ७ | ४१% | ३ | ५०% | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. २४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी कृतिपुस्तिका, प्रकल्प पुस्तके उपलब्ध आहेत. उर्वरित ३५% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे पर्यावरण शिक्षण देण्यासाठी संगणक इंटरनेट व ग्रंथालयातील संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. उर्वरित १२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे पर्यावरण शिक्षण देण्यासाठी नकाशे, पोस्टर्स व जीवशास्त्र प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. उर्वरित ४१% पर्यावरण शिक्षकांकडे पर्यावरण शिक्षणांसाठी कोणतीही साधने उपलब्ध नाहीत.

२. इ.११ वी, १२ वीच्या ५०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी कोणतीही साधने उपलब्ध नाहीत.

उर्वरित ५०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी नकाशे, पोस्टर, जीवशास्त्र प्रयोगशाळा उपलब्ध आहेत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ४०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी कृतिपुस्तिका प्रकल्प, पुस्तके उपलब्ध आहेत. उर्वरित ६०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे इंटरनेट, ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ, कॉम्प्युटर उपलब्ध आहेत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (२४%) शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी कृतिपुस्तिका, प्रकल्प, पुस्तके उपलब्ध आहेत. उर्वरित अल्प (३५%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे पर्यावरण शिक्षण देण्यासाठी इंटरनेट, ग्रंथालय, संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच कॉम्प्युटर आहेत. अत्यल्प (१२%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे पर्यावरण शिक्षण देण्यासाठी नकाशे, पोस्टर, जीवशास्त्र प्रयोगशाळा उपलब्ध आहेत. उर्वरित अल्प (४१%) शाळांमधील पर्यावरण शिक्षकांकडे पर्यावरण साधने उपलब्ध नाहीत.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या निम्म्या (५०%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी नकाशे, पोस्टर जीवशास्त्र प्रयोगशाळा उपलब्ध आहेत.

उर्वरित निम्म्या (५०%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी कोणतीही साधने उपलब्ध नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (४०%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम. /बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण देण्यासाठी कृति पुस्तिका, प्रकल्प, पुस्तके उपलब्ध आहेत. बहुतांशी (६०%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांच्याकडे इंटरनेट, ग्रंथालयातील संदर्भग्रंथ, कॉम्प्युटर उपलब्ध आहेत.

## सारणी क्र. ३९

## शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे अध्यापन करताना जाणवणाऱ्या समस्या

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२६** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी पर्यावरण शिक्षण या विषयाचे अध्यापन करताना जाणवणाऱ्या समस्या कोणत्या?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| विद्यार्थीबरोबर वैयक्तिक चर्चेस वेळ मिळत नाही तसेच प्रकल्पास वेळ नाही. | ३ | ३५% | २ | ३२% | ०० | ०० |
| विद्यार्थ्यांना प्रकल्प पूर्ण करताना आर्थिक समस्या येतात. | ३ | १८% | ०० | ०० | १ | २०% |
| अध्यापनास साधने अपुरी आहेत. | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |
| कृतीयुक्त शिक्षणावर भर नाही. | २ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |
| तासिका कमी, अभ्यासक्रम मोठा प्रशिक्षणाचा अभाव. | २ | १२% | २ | ३४% | २ | ४०% |
| अध्यापन करण्यास स्वतंत्र पर्यावरण शिक्षक नाही | ०० | ०० | २ | ३४% | ०० | ०० |
| शेवटची तासिका त्यामुळे विद्यार्थी अनुपस्थिती जाणवते. | ०० | ०० | ०० | ०० | २ | ४०% |
| कोणताही प्रतिसाद नाही | ४ | २३% | १ | १७% | १ | २०% |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. इ.९वी, १०वीच्या ३५% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाचे अध्यापन करताना विद्यार्थ्यांना वैयक्तिक जाणवणारी समस्या म्हणजे चर्चेस वेळ मिळत नाही. तसेच प्रकल्पास वेळ मिळत नाही. १८% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी विद्यार्थ्यांना प्रकल्प पूर्ण करताना आर्थिक समस्या येतात. १८% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी अध्यापनास साधने अपुरी पडतात. १२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार कृतीयुक्त शिक्षणावर भर नाही. १२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार पर्यावरण शिक्षणासाठी तासिका कमी व त्या मानाने अभ्यासक्रम मोठा आहे आणि प्रशिक्षणाचा अभाव आहे. उर्वरित २३% पर्यावरण शिक्षकांनी वरील प्रश्नाबाबत आपला प्रतिसाद दर्शविला नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ३२% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाचे अध्यापन करताना जाणवणारी समस्या म्हणजे विद्यार्थ्यांना वैयक्तिक चर्चेस वेळ मिळत नाही. तसेच प्रकल्पास वेळ मिळत नाही. ३४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी तासिका कमी, अभ्यासक्रम मोठा प्रशिक्षणाचा अभाव आहे. ३४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी

अध्यापनाकरीता स्वतंत्र पर्यावरण शिक्षक नाही. उर्वरित १७% पर्यावरण शिक्षकांनी वरील प्रश्नाबाबत आपला प्रतिसाद दर्शविला नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाचे अध्यापन करताना जाणवणारी समस्या म्हणजे विद्यार्थ्यांना प्रकल्प पूर्ण करताना आर्थिक समस्या येतात. ४०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार त्यांना तासिका कमी, अभ्यासक्रम मोठा व प्रशिक्षणाचा अभाव जाणवतो. ४०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार पर्यावरण शिक्षण विषयाची शेवटची तासिका त्यामुळे विद्यार्थ्यांची अनुपस्थिती जाणवते. उर्वरित २०% पर्यावरण शिक्षकांनी वरील प्रश्नाबाबत कोणताही प्रतिसाद दर्शविला नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की

१. इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे अध्यापंन करताना शिक्षकांना पुढील समस्या येतात –

१. विद्यार्थ्यांशी वैयक्तिक चर्चेस वेळ मिळत नाही.

२. प्रकल्प पूर्ण करताना विद्यार्थ्यांना आर्थिक समस्या जाणवतात.

३. अध्यापनास साधने अपुरी पडतात.

४. कृतीयुक्त शिक्षणावर भर नाही.

५. पर्यावरण शिक्षण विषयासाठी तासिका कमी व त्यामानाने अभ्यासक्रम मोठा आहे.

२. इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे अध्यापन करताना शिक्षकांना पुढील समस्या येतात –

१. विद्यार्थ्यांशी वैयक्तिक चर्चेस वेळ मिळत नाही.

२. पर्यावरण शिक्षण विषयासाठी तासिका कमी व त्यामानाने अभ्यासक्रम मोठा आहे.

३. पर्यावरण शिक्षण विषयाच्या अध्यापनास स्वतंत्र पर्यावरण शिक्षक नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयाचे अध्यापन करताना शिक्षकांना पुढील समस्या येतात.

१. विद्यार्थ्यांना प्रकल्प पूर्ण करताना आर्थिक समस्या येतात.

२. पर्यावरण शिक्षण विषयासाठी तासिका कमी व त्यामानाने अभ्यासक्रम मोठा आहे.

३. पर्यावरण शिक्षण विषयाची शेवटची तासिका असल्यामुळे विद्यार्थ्यांची अनुपस्थिती असते.

**सारणी क्र. ४०**

**पर्यावरण शिक्षण या विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविणे.**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२७** | **इ.९वी, १०वी/इ.११वी,१२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण या विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम आपण राबविता का?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ श्क्षिक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | १६ | ९४% | १ | ६% | १ | १६% | ५ | ८४% | ३ | ६०% | २ | ४०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या ९४% पर्यावरण शिक्षक इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवितात. उर्वरित ६% पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवत नाहीत.

२. इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे १६% पर्यावरण शिक्षक इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवितात. उर्वरित ८४% पर्यावरण शिक्षक इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे ६०% पर्यावरण शिक्षक एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवितात. उर्वरित ४०% पर्यावरण शिक्षक असे उपक्रम राबवित नाहीत.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (९४%) पर्यावरण शिक्षक इ.९वी, इ.१०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवितात. उर्वरित अत्यल्प (६%) पर्यावरण शिक्षक इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवत नाहीत.

२. इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे अत्यल्प (१६%) पर्यावरण शिक्षक इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवतात. उर्वरित बहुतांशी (८४%) पर्यावरण शिक्षक इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे बहुतांशी (६०%) पर्यावरण शिक्षक एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण विषयासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवितात. उर्वरित (४०%) पर्यावरण शिक्षक असे उपक्रम राबवित नाहीत.

**सारणी क्र. ४१**

**शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा आहेत की नाहीत याबाबत शिक्षकांची मते.**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२८** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा आहेत की नाहीत?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ८ | ४७% | ९ | ५३% | २ | ३३% | ४ | ६७% | ५ | १००% | ०० | ०० |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या ४७% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षण अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा आहेत.

उर्वरित ५३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षण अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा नाहीत.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या ३३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा आहेत. उर्वरित ६७% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा आहेत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या जवळपास निम्म्या (४७%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा आहेत. उर्वरित जवळपास निम्म्या (५३%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा नाहीत.

२. इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (३३%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा आहेत. उर्वरित बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या तासिका पर्यावरण शिक्षणाचे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम पूर्ण करण्यास पुरेशा आहेत.

**सारणी क्र. ४२**

**पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी विद्यार्थ्यांच्या प्रतिसादाबाबत शिक्षकांची मते.**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.२९** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद कसा असतो?** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| योग्य / चांगला प्रतिसाद | ७ | ४१% | १ | १६% | ०० | ०० |
| मध्यम प्रतिसाद | ७ | ४१% | ५ | ८४% | ५ | १००% |
| प्रतिसाद नाही. | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. ४१% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी योग्य प्रतिसाद असतो.

४१% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी मध्यम प्रतिसाद असतो. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी प्रतिसाद नसतो.

२. इ.११वी, १२वीच्या १६% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी योग्य प्रतिसाद असतो. उर्वरित ८४% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी मध्यम प्रतिसाद असतो.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी योग्य प्रतिसाद असतो.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (४१%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी योग्य प्रतिसाद असतो. अल्प (४१%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी मध्यम प्रतिसाद असतो. उर्वरित अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी प्रतिसाद नसतो.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (१६%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी योग्य प्रतिसाद असतो. उर्वरित बहुतांशी (८४%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी मध्यम प्रतिसाद असतो.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या विद्यार्थ्यांचा पर्यावरण शिक्षणाच्या अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमासाठी योग्य प्रतिसाद असतो.

**सारणी क्र. ४३**

**पर्यावरणविषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३१** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबवताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते काय?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ११ | ६५% | ६ | ३५% | ४ | ६७% | २ | ३३% | ४ | ८०% | १ | २०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ६५% पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते. उर्वरित ३५%

पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळत नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ६७% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांना इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या ८०% पर्यावरण शिक्षकांना एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते. उर्वरित २०% पर्यावरण शिक्षकांना एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक सहकार्य मिळत नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (६५%) पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते. उर्वरित अल्प (३५%) पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळत नाही.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते. उर्वरित अल्प (३३%)

पर्यावरण शिक्षकांना इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (८०%) पर्यावरण शिक्षकांना एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते. उर्वरित अत्यल्प (२०%) पर्यावरण शिक्षकांना एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविता- ना सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळत नाही.

## सारणी क्र. ४४
## पर्यावरण शिक्षणविषयक उपक्रम राबविताना ज्यांचे सहकार्य मिळते अशा सामाजिक संस्था

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३२ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणविषयक उपक्रम राबविताना कोणत्या संस्थांचे सहकार्य मिळते? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| निसर्गमित्र, कोल्हापूर | ३ | १८% | १ | १७% | ०० | ०० |
| जनस्वास्थ्य दक्षता समिती, कोल्हापूर | २ | १२% | २ | ३४% | ०० | ०० |
| महानगरपालिका कृषी खाते व कृषी महाविद्यालय, कोल्हापूर | ३ | १८% | २ | ३४% | ०० | ०० |
| अंधश्रध्दा निर्मूलन समिती, कोल्हापूर | २ | ११% | ०० | ०० | ०० | ०० |
| विश्व प्रकृति निधी, कोल्हापूर | ०० | ०० | ०० | ०० | ४ | ८०% |
| शिवाजी विद्यापीठ, पर्यावरण शाळा विभाग, कोल्हापूर | ०० | ०० | ०० | ०० | २ | ४०% |
| कोणाकडूनही सहकार्य नाही | ८ | ४७% | २ | ३३% | १ | २०% |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. १८% पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयक उपक्रम राबविताना निसर्गमित्र कोल्हापूर संस्थेचे सहकार्य पर्यावरणविषयक उपक्रम राबविण्यासाठी मिळते. १२% पर्यावरण शिक्षकांना जनस्वास्थ दक्षता समिती कोल्हापूर सहकार्य करते. १८% पर्यावरण शिक्षकांना महानगरपालिका, कृषीखाते, कृषीमहाविद्यालय कोल्हापूर संस्था सहकार्य करतात. ११% पर्यावरण शिक्षकांना अंधश्रध्दा निर्मूलन समिती सहकार्य करते. उर्वरित ४७% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना कोणत्याही संस्थेचे सहकार्य लाभत नाही.

२. इ.११वी, १२वीच्या १७% पर्यावरण शिक्षकांना इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना निसर्गमित्र, कोल्हापूर या संस्थेचे सहकार्य मिळते. ३४% पर्यावरण शिक्षकांना जनस्वास्थ दक्षता समिती, कोल्हापूर संस्था सहकार्य करते. ३४% पर्यावरण शिक्षकांना महानगरपालिका, कृषिखाते, कृषिमहाविद्यालय, कोल्हापूर या संस्था सहकार्य करतात. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना कोणत्याही संस्थेचे सहकार्य लाभत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी ८०% पर्यावरण शिक्षकांना एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरणविषयक उपक्रम राबविताना विश्व प्रकृती निधी, कोल्हापूर या संस्थेचे सहकार्य मिळते. ४०% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हा विभाग सहकार्य करतो.

उर्वरित २०% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना कोणत्याही संस्थेचे सहकार्य लाभत नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना पुढील सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते.

१. निसर्गमित्र संस्था, कोल्हापूर

२. जनस्वास्थ दक्षता समिती, कोल्हापूर

३. महानगरपालिका, कृषिखाते व कृषिमहाविद्यालय, कोल्हापूर

४. अंधश्रध्दा निर्मूलन समिती, कोल्हापूर शाखा.

परंतु ४७% पर्यावरण शिक्षकांनी मात्र असे सहकार्य घेतलेले नाही.

२. इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना पुढील सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते.

१. निसर्गमित्र संस्था, कोल्हापूर

२. जनस्वास्थ दक्षता समिती, कोल्हापूर

३. अंधश्रध्दा निर्मूलन समिती, कोल्हापूर

परंतु ३३% पर्यावरण शिक्षकांनी मात्र असे सहकार्य घेतलेले नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक उपक्रम राबविताना पुढील सामाजिक संस्थांचे सहकार्य मिळते.

१. विश्वप्रकृती निधी, कोल्हापूर शाखा.

२. पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

परंतु २०% पर्यावरण शिक्षकांनी मात्र असे सहकार्य घेतलेले नाही.

## सारणी क्र. ४५
## शैक्षणिक संस्थांमधून राबविले जाणारे अभ्यासेतर उपक्रम

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३३ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक अभ्यास पूरक व अभ्यासेतर कोणकोणते उपक्रम राबवले जातात? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये–६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| क्षेत्रभेट सहली, स्लाईड शो. | ६ | ३४% | ३ | ५०% | ३ | ६०% |
| स्वच्छता मोहीम | ३ | १८% | २ | ३३% | ०० | ०० |
| वृक्षारोपण | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |
| वन्यजीव सप्ताह | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |
| उपक्रम राबवले जात नाहीत | ३ | १८% | २ | ३४% | २ | ४०% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ३४% पर्यावरण शिक्षक इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण विषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमामध्ये क्षेत्रभेट, सहल व स्लाईड शो आयोजित करतात. १८% पर्यावरण शिक्षक स्वच्छता मोहीम राबवितात. १८% पर्यावरण शिक्षक वृक्षारोपण कार्यक्रम राबवितात. १८% पर्यावरण शिक्षक वन्यजीव सप्ताह सोहळा राबवितात. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षक कोणतेही उपक्रम राबविले जात नाहीत असे सांगतात.

२. ५०% पर्यावरण शिक्षक इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमामध्ये क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो आयोजित करतात. ३३% पर्यावरण शिक्षक स्वच्छता मोहीम राबवतात, उर्वरित ३४% पर्यावरण शिक्षक कोणतेही उपक्रम राबविले जात नाहीत, असे सांगतात.

३. ६०% पर्यावरण शिक्षक एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमामध्ये क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो अयोजित करतात. उर्वरित ४०% पर्यावरण शिक्षक कोणतेही उपक्रम राबविले जात नाहीत, असे सांगतात.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (३४%) पर्यावरण शिक्षक इ.९वी व १०वीसाठी पर्यावरण विषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमामध्ये क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो आयोजित करतात. अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षक स्वच्छता मोहीम राबवितात. अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षक वृक्षारोपण कार्यक्रम राबवितात. अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षक वन्यजीव सप्ताह सोहळा राबवितात. उर्वरित अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षक कोणतेही उपक्रम राबविले जात नाहीत असे सांगतात.

२. इ.११वी, १२वीचे निम्मे (५०%) पर्यावरण शिक्षक इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमामध्ये क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो आयोजित करतात. अल्प (३३%) पर्यावरण शिक्षक स्वच्छता मोहीम राबवितात. उर्वरित अल्प (३४%) पर्यावरण शिक्षक कोणतेही उपक्रम राबविले जात नाहीत असे सांगतात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीचे बहुतांशी (६०%) पर्यावरण शिक्षक एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण विषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमामध्ये क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो आयोजित करतात.

उर्वरित अल्प (४०%) पर्यावरण शिक्षक कोणतेही उपक्रम राबविले जात नाहीत असे सांगतात.

**सारणी क्र. ४६**

**शाळेत/महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या पर्यावरणविषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमांबाबत मुख्याध्यापक/प्राचार्यांनी दिलेली माहिती.**

| मुख्याध्यापक/ प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.२२ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी कोणकोणते पर्यावरण विषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम आपल्या शाळेत/महाविद्यालयात राबविले जातात? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| क्षेत्रभेट, व्याख्यान, स्लाईड शो, प्रकल्प, सहल. | ६ | ४६% | ४ | १००% | २ | ६७% |
| वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, प्रभातफेरी | ५ | ३८% | ०० | ०० | ०० | ०० |
| पर्यावरण दिन व निबंध स्पर्धा | ३ | २३% | ०० | ०० | १ | ३३% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ४६% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीसाठी त्यांच्या शाळेत क्षेत्रभेट, व्याख्यान, स्लाईड शो, प्रकल्प, सहली हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवले जातात. ३८% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार त्यांच्या शाळेत इ.९वी, १०वीसाठी वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, प्रभातफेरी हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवले जातात. उर्वरित २३% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार त्यांच्या शाळेत इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण दिन व निबंध स्पर्धा हे उपक्रम राबविले जातात.

२. कनिष्ठ महाविदयालयाच्या १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीसाठी क्षेत्रभेट व्याख्यान, स्लाईड शो, प्रकल्प, सहली हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवले जातात.

३. वरिष्ठ महाविदयालयाच्या ६७% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार त्यांच्या महाविद्यालयात एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी क्षेत्रभेट, व्याख्यान, स्लाईड शो, प्रकल्प, सहली हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवले जातात. उर्वरित ३३% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार त्यांच्या महाविद्यालयात एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण दिन, निबंध स्पर्धा हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवले जातात.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. जवळपास निम्म्या (४६%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार त्यांच्या शाळेत इ.९वी, १०वीसाठी क्षेत्रभेट, व्याख्यान, स्लाईड शो, प्रकल्प व सहली हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवले जातात. अल्प (३८%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार त्यांच्या शाळेत इ.९वी, १०वीसाठी वृक्षारोपण, परिसर स्वच्छता व प्रभातफेरी हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवले जातात. उर्वरित अत्यल्प (२३%) मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार त्यांच्या शाळेत इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण दिन, निबंध स्पर्धा हे उपक्रम राबवले जातात.

२. कनिष्ठ महाविदयालयाच्या सर्व (१००%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार त्यांच्या महाविद्यालयात इ.११वी, १२वीसाठी क्षेत्रभेट, व्याख्यान, स्लाईड शो, प्रकल्प व सहली हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवले जातात.

३. वरिष्ठ महाविदयालयाच्या बहुतांशी (६७%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार त्यांच्या महाविद्यालयात एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी क्षेत्रभेट, व्याख्यान, स्लाईड शो, प्रकल्प व सहली हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविले जातात. उर्वरित अल्प (३३%) प्राचार्यांच्या सांगण्यानुसार त्यांच्या महाविद्यालयात एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण दिन व निबंध स्पर्धा हे अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविले जातात.

**सारणी क्र. ४७**
**पर्यावरण शिक्षणासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविताना पर्यावरण शिक्षकांना येणाऱ्या समस्या.**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३४** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविताना येणाऱ्या समस्या कोणत्या?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| वेळ कमी, विषयाची व्याप्ती जास्त. | ४ | २४% | ०० | ०० | १ | २०% |
| प्रकल्प/उपक्रम खर्चिक | ४ | २४% | २ | ३३% | ०० | ०० |
| उपक्रमाबद्दल पालक, विदयार्थी व समाज नाखुश. | ५ | २८% | ३ | ५०% | ०० | ०० |
| माहिती पुस्तकांचा अभाव | १ | ६% | ०० | ०० | ०० | ०० |
| प्रतिसाद नाही. | ४ | २४% | २ | ३३% | ४ | ८०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. २४% पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणासाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविताना जाणवणारी समस्या म्हणजे पर्यावरण शिक्षणासाठी वेळ कमी व विषयाची व्याप्ती जास्त वाटते. २४% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरणविषयक प्रकल्प/उपक्रम खर्चिक वाटतात. २८%

पर्यावरण शिक्षकांच्या मते अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रमाबाबत पालक, विद्यार्थी, समाज नाखूश असतो. ६% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाच्या माहिती पुस्तकांचा अभाव जाणवतो. उर्वरित २४% पर्यावरण शिक्षकांनी वरील प्रश्नाबाबत प्रतिसाद दर्शविलेला नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ३३% पर्यावरण शिक्षकांना इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण विषयक प्रकल्प/उपक्रम खर्चिक वाटतात. ५०% पर्यावरण शिक्षकांना उपक्रमाबद्दल पालक, विद्यार्थी, समाज नाखुष असतात असे वाटते. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांनी वरील प्रश्नाबाबत प्रतिसाद दर्शविलेला नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २०% पर्यावरण शिक्षकांना एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणासाठी अभ्यासेतर व अभ्यासपूरक उपक्रम राबविताना पर्यावरण शिक्षण विषयासाठी वेळ कमी आणि विषयाची व्याप्ती जास्त वाटते. उर्वरित ८०% पर्यावरण शिक्षकांनी वरील प्रश्नाबाबत प्रतिसाद दर्शविलेला नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविताना पर्यावरण शिक्षकांना पुढील समस्या जाणवतात.

    १. वेळ कमी आणि विषयाची व्याप्ती जास्त वाटते.
    २. पर्यावरण विषयक प्रकल्प/उपक्रम खर्चिक वाटतात.
    ३. उपक्रमाबाबत पालक, विद्यार्थी, समाज नाखुष असतात.
    ४. माहिती पुस्तकांचा अभाव जाणवतो.

२. इ.११वी, १२वीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविताना पर्यावरण शिक्षकांना पुढील समस्या जाणवतात.

    १. पर्यावरणविषयक प्रकल्प/उपक्रम खर्चिक वाटतात.

२. उपक्रमांबाबत पालक, विद्यार्थी, समाज नाखूष असतात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविताना पर्यावरण शिक्षकांना पुढील समस्या जाणवते.

१. वेळ कमी व विषयाची व्याप्ती जास्त वाटते.

## सारणी क्र. ४८

## पर्यावरण विषयक अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यात मुख्याध्यापक/प्राचार्यांना जाणवणाऱ्या समस्या.

| मुख्याध्यापक/ प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.२३ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यात कोणत्या समस्या येतात? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| पर्यावरण शिक्षक उत्साही नाहीत. | ०० | ०० | ३ | ७५% | ०० | ०० |
| विद्यार्थी उत्सुक नसतात. | ०० | ०० | २ | ५०% | ०० | ०० |
| पुरेसा वेळ उपलब्ध नाही. | ९ | ६९% | ०० | ०० | २ | ६७% |
| आर्थिक समस्या येतात. | ५ | ३८% | ०० | ०० | १ | ३३% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ६९% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवण्यात येणारी समस्या म्हणजे पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषय घेण्यास पुरेसा वेळ उपलब्ध होत नाही. उर्वरित ३८% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यासंदर्भात आर्थिक समस्या जाणवते.

२. कनिष्ठ महाविदयालयाच्या ७५% प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यात येणारी समस्या म्हणजे पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षण देण्यासाठी उत्साही नाहीत. उर्वरित ५०% प्राचार्यांच्या

मते इ.११वी, १२वीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यासंदर्भात विद्यार्थी उत्सुक नसतात.

३. वरीष्ठ महाविदयालयाच्या ६७% प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए. /बी.कॉम./बी.एस्सीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबवण्यात येणारी समस्या म्हणजे पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय घेण्यास पुरेसा वेळ उपलब्ध नाही. उर्वरित ३३% प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यासंदर्भात आर्थिक समस्या जाणवते.

**अर्थनिर्वचन**

यावरुन असे दिसून येते की,

१. मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यात येणाऱ्या समस्या पुढील प्रमाणे.

   १. पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण हा विषय घेण्यास पुरेसा वेळ उपलब्ध होत नाही.

   २. हे उपक्रम राबविण्यासंदर्भात आर्थिक समस्या जाणवते.

२. कनिष्ठ महाविदयालयाच्या प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यात येणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे.

   १. पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षण देण्यासाठी उत्साही नाहीत.

   २. अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यासंदर्भात विद्यार्थी उत्सुक नसतात.

३. वरिष्ठ महाविदयालयाच्या प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यात येणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे.

१. पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषय घेण्यास पुरेसा वेळ उपलब्ध होत नाही.

२. अभ्यासपूरक व अभ्यासेतर उपक्रम राबविण्यासंदर्भात आर्थिक समस्या जाणवते.

## सारणी क्र. ४९
## पर्यावरण शिक्षणाच्या पुस्तकांमध्ये दिलेल्या उपक्रमांबाबत शिक्षकांची मते

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३५** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाच्या पुस्तकांमध्ये दिलेल्या उपक्रमांबाबत.** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | उपक्रम | | प्रकल्प | | उपक्रम | | प्रकल्प | | उपक्रम | | प्रकल्प | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| वेळेवर पूर्ण होणारे नाहीत. | १५ | ८८% | १५ | ८८% | ५ | ८४% | ५ | ८४% | ५ | १००% | ५ | १००% |
| मुलांना झेपण्यासारखे नाहीत. | ३ | १८% | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| मुलांना उपक्रमांमध्ये आवड नाही. | ०० | ०० | ०० | ०० | २ | ३३% | २ | ३३% | ०० | ०० | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ८८% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेले उपक्रम व प्रकल्प वेळेत पूर्ण होणारे नाहीत. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेले प्रकल्प व उपक्रम मुलांना झेपण्यासारखे नाहीत.

२. इ.११वी,१२वीच्या ८४% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेले उपक्रम व प्रकल्प वेळेत पूर्ण होणारे

नाहीत. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेल्या उपक्रमामध्ये मुलांना आवड नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेले उपक्रम व प्रकल्प वेळेवर पूर्ण होणारे नाहीत.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (८८%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेले उपक्रम व प्रकल्प वेळेत पूर्ण होणारे नाहीत. उर्वरित अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेले उपक्रम व प्रकल्प मुलांना झेपण्यासारखे नाहीत.

२. इ.११वी व १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (८४%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकात दिलेले उपक्रम व प्रकल्प वेळेत पूर्ण होणारे नाहीत. उर्वरित अल्प (३३%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेल्या उपक्रम व प्रकल्पामध्ये मुलांना आवड नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.ला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण या पुस्तकामध्ये दिलेले उपक्रम व प्रकल्प वेळेत पूर्ण होणारे नाहीत.

## सारणी क्र. ५०
## पर्यावरण शिक्षणाच्या मूल्यमापनाची गरज आहे की नाही याबाबतची शिक्षकांची मते.

| शिक्षक प्रश्नावली क्र.३६ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीयांना पर्यावरण शिक्षणाच्या मूल्यमापनाची गरज आहे काय? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | १७ | १००% | ०० | ०० | ६ | १००% | ०० | ०० | ५ | १००% | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या मूल्यमापनाची गरज आहे.

२. इ.११वी, १२वीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या मूल्यमापनाची गरज आहे.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या मूल्यमापनाची गरज आहे.

### अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकवणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या मूल्यमापनाची गरज आहे.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या मूल्यमापनाची गरज आहे.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या मूल्यमापनाची गरज आहे.

**सारणी क्र. ५१**

**पर्यावरण शिक्षणाच्या संदर्भातील मूल्यमापनाच्या पध्दती**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३७** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षण हा विषय असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन कसे करता?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| लेखी परीक्षा व उपक्रम यांना गुण व श्रेणी देऊन. | १७ | १००% | ६ | १००% | ५ | १००% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या १००% शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वी मधील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन लेखी परीक्षा व उपक्रम यांना गुण व श्रेणी देवून केले जाते.

२. इ.११वी, १२वीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वी मधील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन लेखी परीक्षा व उपक्रमांना गुण व श्रेणी देवून करतात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्या-नुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन लेखी परीक्षा व उपक्रमांना गुण व श्रेणी देवून केले जाते.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन लेखी परीक्षा व उपक्रम यांना गुण व श्रेणी देवून केले जाते.

२. इ.११वी व १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन लेखी परीक्षा व उपक्रमांना गुण व श्रेणी देवून करतात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन लेखी परीक्षा व उपक्रमांना गुण व श्रेणी देवून केले जाते.

## सारणी क्र. ५२
## पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीच्या वापराबाबत पर्यावरण शिक्षकांची मते.

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३८ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दती वापर योग्य आहे की अयोग्य? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा - १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये - ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये - ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| योग्य आहे. | १३ | ७६% | ५ | ८४% | २ | ४०% |
| अयोग्य आहे. | ४ | २४% | १ | १६% | ३ | ६०% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ७६% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर योग्य आहे. उर्वरित २४% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर अयोग्य आहे.

२. इ.११वी, १२वीच्या ८४% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर योग्य आहे. उर्वरित १६% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर अयोग्य आहे.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या ४०% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर योग्य आहे. उर्वरित

६०% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर अयोग्य आहे.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (७६%) शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर योग्य आहे. उर्वरित अत्यल्प (२४%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर अयोग्य आहे.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (८४%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर योग्य आहे. उर्वरित अत्यल्प (१६%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर अयोग्य आहे.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (४०%) पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर योग्य आहे. उर्वरित बहुतांशी (६०%) पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात श्रेणी पध्दतीचा वापर अयोग्य आहे.

## सारणी क्र. ५३
## मूल्यमापन अभ्यासक्रमातील मुद्याला अनुसरून केले जाते की नाही याबाबत शिक्षकांची मते.

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३९ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी.यांचे पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन अभ्यासक्रमातील मुद्याला अनुसरून केले जाते की सर्वसाधारणपणे केले जाते? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| मुद्याला अनुसरून | १४ | ८२% | ४ | ६७% | ५ | १००% |
| सर्वसाधारणपणे | ३ | १८% | २ | ३३% | ०० | ०० |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की

१. इ.९वी, १०वीच्या ८२% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन अभ्यासक्रमातील मुद्याला अनुसरून केले जाते. उर्वरित १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण विषयाचे मूल्यमापन सर्वसाधारणपणे केले जाते.

२. इ.११वी, १२वीच्या ६७% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन अभ्यासक्रमातील मुद्याला अनुसरून केले जाते. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन सर्वसाधारणपणे केले जाते.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन मुद्याला अनुसरून केले जाते.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (८२%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन अभ्यासक्रमातील मुद्याला अनुसरून केले जाते. उर्वरित अत्यल्प (१८%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन सर्वसाधारणपणे केले जाते.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन मुद्याला अनुसरून केले जाते. उर्वरित अल्प (३३%) पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षण या विषयाचे मूल्यमापन सर्वसाधारणपणे केले जाते.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन मुद्याला अनुसरून केले जाते.

## सारणी क्र. ५४
## पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होते की नाही याबद्दलची माहिती.

| शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.४० | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होते की नाही? | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ४ | २४% | १३ | ७६% | ३ | ५०% | ३ | ५०% | ०० | ०० | ५ | १००% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. इ.९वी, १०वीच्या २४% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होते. उर्वरित ७६% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होत नाही.

२. इ.११वी, १२वीच्या ५०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होते. उर्वरित ५०% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होत नाही.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अत्यल्प (२४%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होते. उर्वरित बहुतांशी (७६%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होत नाही.

२. इ.११वी, १२वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या निम्म्या (५०%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होते. उर्वरित निम्म्या (५०%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होत नाही.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनाची निश्चित प्रणाली पर्यावरण शिक्षकांना उपलब्ध होत नाही.

## सारणी क्र. ५५
## पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयातील मूल्यमापनात समस्या येतात किंवा नाही.

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.४१** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येतात का?** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | | | |
| | होय | | नाही | | होय | | नाही | | होय | | नाही | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| | ३ | ३३% | १४ | ६७% | ४ | ६७% | २ | ३३% | ०० | ०० | ५ | १००% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की

१. इ.९वी, १०वीच्या ३३% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येतात. उर्वरित ६७% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येत नाहीत.

२. इ.११वी, १२वीच्या ६७% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येतात. उर्वरित ३३% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येत नाहीत.

### अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येते की,

१. इ.९वी, १०वीला पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणाऱ्या अल्प (३३%) पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या

येतात. उर्वरित बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येत नाहीत.

२. इ.११वी, १२वीच्या बहुतांशी (६७%) पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येतात. उर्वरित अल्प (३३%) पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात समस्या येत नाहीत.

**सारणी क्र. ५६**

**पर्यावरण शिक्षण या विषयातील मूल्यमापनात येणाऱ्या समस्या**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.४२** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात कोणत्या समस्या येतात?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| मूल्यांकन करता येत नाही. | ४ | २३% | ५ | ८३% | ०० | ०० |
| प्रश्नाचे नेमके स्वरूप कसे दयावे हे समजत नाही. | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |
| प्रश्नपत्रिकेच्या आराखडयाचा अभाव | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |
| समस्या नाहीत. | ८ | ४७% | १ | १७% | ५ | १००% |

## निरीक्षण

१. वरील सारणीवरून असे दिसून येते की २३% पर्यावरण शिक्षकांना इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षण विषयातील मूल्यमापनात येणारी समस्या म्हणजे त्यांना पर्यावरण विषयाचे मूल्यांकन करता येत नाही. १८% पर्यावरण शिक्षकांना प्रश्नाचे नेमके स्वरूप कसे दयावे हे समजत नाही. १८% पर्यावरण शिक्षकांना

पर्यावरण शिक्षण विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या आराखडयाचा अभाव जाणवतो. उर्वरित ४७% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना समस्या येत नाहीत.

२. इ.११वी, १२वीच्या ८३% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी त्यांना पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यांकन करता येत नाही. उर्वरित १७% पर्यावरण शिक्षकांना पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना समस्या येत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना समस्या येत नाहीत.

**अर्थनिर्वचन**

यावरुन असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात येणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे आहेत.

   १. पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यांकन करता येत नाही.

   २. प्रश्नाचे नेमके स्वरूप कसे दयावे हे समजत नाही.

   ३. पर्यावरण शिक्षण विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या आराखडयाचा अभाव जाणवतो.

२. इ.११वी, १२वीच्या पर्यावरण शिक्षणातील मूल्यमापनात येणारी समस्या म्हणजे पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यांकन करता येत नाही.

३. सर्व (१००%) पर्यावरण शिक्षकांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना त्यांना समस्या येत नाहीत.

## सारणी क्र. ५७
## पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना कोणत्या समस्या जाणवतात याबाबत मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी दिलेली माहिती.

| **मुख्याध्यापक/प्राचार्य प्रश्न क्र.२४** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीचे पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना कोणत्या समस्या जाणवतात?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा- १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये - ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये - ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| श्रेणीमुळे अचूक मूल्यमापन होत नाही. | ८ | ६२% | ०० | ०० | ०० | ०० |
| विद्यार्थ्यांची कृती कमी पडते. | २ | १६% | ०० | ०० | ०० | ०० |
| विषय नवीन असल्याने विद्यार्थी प्रतिसाद कमी. | ४ | ३०% | २ | ५०% | ०० | ०० |
| विद्यार्थ्यांचे पर्यावरण शिक्षणविषयी ज्ञान अपूरे. | ०० | ०० | २ | ५०% | ३ | १००% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ६२% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणारी समस्या म्हणजे श्रेणीमुळे अचूक मूल्यमापन होत नाही. १६% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणारी समस्या म्हणजे विद्यार्थ्यांची कृती कमी पडते. उर्वरित ३०% मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणारी समस्या म्हणजे विषय नवीन असल्याने विद्यार्थी प्रतिसाद कमी वाटतो.

२. कनिष्ट महाविदयालयाच्या ५०% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणारी समस्या म्हणजे विषय नवीन असल्याने विद्यार्थी प्रतिसाद कमी वाटतो. उर्वरित ५०% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणारी समस्या म्हणजे विद्यार्थ्यांचे पर्यावरण शिक्षणाविषयी असणारे अपूरे ज्ञान.

३. वरिष्ट महाविदयालयाच्या १००% प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणारी समस्या म्हणजे विद्यार्थ्यांचे पर्यावरण शिक्षणाविषयी असणारे अपूरे ज्ञान.

**अर्थनिर्वचन**

यावरुन असे म्हणता येईल की,

१. मुख्याध्यापकांच्या सांगण्यानुसार इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणारी समस्या पुढीलप्रमाणे.

    १. श्रेणीमुळे अचूक मूल्यमापन होत नाही.

    २. विद्यार्थ्यांची कृति कमी पडते.

    ३. विषय नवीन असल्याने विद्यार्थी प्रतिसाद कमी वाटतो.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांच्या सांगण्यानुसार इ.११वी व १२वीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणारी समस्या पुढीलप्रमाणे.

    १. विषय नवीन असल्याने विद्यार्थी प्रतिसाद कमी वाटतो.

    २. विद्यार्थ्यांचे पर्यावरण शिक्षणाविषयी असणारे अपूरे ज्ञान.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांच्या सांगण्यानुसार एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्या पुढीलप्रमाणे.

१. विद्यार्थ्यांचे पर्यावरण शिक्षणाविषयी असणारे अपूरे ज्ञान.

**सारणी क्र. ५८**

**पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शिक्षकांनी सुचवलेले उपाय**

| **शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.४३** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून कोणते उपाय सुचवाल?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १७ शिक्षक) | | इ.११वी, १२ वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ६ शिक्षक) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ५ शिक्षक) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| भेटी व सहलीचे आयोजन करणे. | २ | १२% | ०० | ०० | ०० | ०० |
| प्रकल्पावर भर दयावा. | ३ | १८% | १ | १७% | ०० | ०० |
| शासनाचे प्रोत्साहन हवे. | ३ | १८% | २ | ३४% | ०० | ०० |
| पर्यावरण शिक्षणाच्या तासिका वाढवाव्यात. | ३ | १८% | २ | ३४% | ०० | ०० |
| श्रेणीऐवजी गुणांचा वापर व्हावा. | ३ | १८% | ०० | ०० | ०० | ०० |
| शैक्षणिक साधने उपलब्ध करावी. | २ | १२% | ०० | ०० | १ | २०% |
| पर्यावरण शिक्षण विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नेमावा. | १ | ५% | १ | १७% | २ | ४०% |
| शिक्षक प्रशिक्षणावर भर दयावा. | १ | ५% | १ | १७% | ०० | ०० |
| विदयापीठाच्या पुस्तकातील भाषा अवघड नसावी. | ०० | ०० | ०० | ०० | १ | २०% |
| अभ्यासक्रमाची पुनर्रचना आवश्यक आहे. | ०० | ०० | ०० | ०० | २ | ४०% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की

१. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी भेटी व सहलींचे आयोजन करावे. १८% पर्यावरण शिक्षकांच्या

मते प्रकल्पावर भर देण्यात यावा, १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाचे प्रोत्साहन हवे. १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका वाढवाव्यात. १८% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणाचे मूल्यमापन करताना श्रेणीऐवजी गुणांचा वापर करावा. १२% पर्यावरण शिक्षकांच्या मते शैक्षणिक साधनांची उपलब्धता करावी. ५% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणासाठी स्वतंत्र शिक्षक नेमावा. उर्वरित ५% पर्यावरण शिक्षकांच्या मते शिक्षक प्रशिक्षणावर भर दिला तर पर्यावरण शिक्षणाचा दर्जा उंचावेल.

२. १७% पर्यावरण शिक्षकांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रकल्पावर भर अधिक दिला पाहिजे. ३४% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शासनाचे प्रोत्साहन हवे. ३४% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण विषयाच्या तासिका वाढवाव्यात. १७% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षण विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नेमावा. उर्वरित १७% पर्यावरण शिक्षकांच्या मते शिक्षक प्रशिक्षणावर भर दयावा.

३. २०% पर्यावरण शिक्षकांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शैक्षणिक साधनांची उपलब्धता असावी. ४०% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षण विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नेमावा. २०% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी विद्यापीठातील पुस्तकांची भाषा अवघड नसावी. उर्वरित ४०% पर्यावरण शिक्षकांच्या मते पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावयाचा असेल तर अभ्यासक्रमाची पुनर्रचना करणे आवश्यक आहे.

## अर्थनिर्वचन

यावरुन असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीच्या पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून पर्यावरण शिक्षकांनी सुचविलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

१. भेटी व सहलींचे आयोजन करावे.

२. पर्यावरण शिक्षणासाठी शासनाचे प्रोत्साहन हवे.

३. पर्यावरण शिक्षणाच्या तासिका वाढवाव्यात.

४. पर्यावरण शिक्षण विषयाचे मूल्यमापन करताना श्रेणीऐवजी गुणांचा वापर करावा.

५. शैक्षणिक साधनांची उपलब्धता करावी.

६. पर्यावरण शिक्षणासाठी स्वतंत्र शिक्षक नेमावा.

७. शिक्षक प्रशिक्षणावर भर देण्यात यावा.

२. इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून पर्यावरण शिक्षकांनी सुचविलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्रकल्पावर अधिक भर देण्यात आला पाहिजे.

२. पर्यावरण शिक्षणासाठी शासनाचे प्रोत्साहन हवे.

३. पर्यावरण शिक्षण विषयाच्या तासिका वाढवाव्यात.

४. पर्यावरण शिक्षण विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नेमावा.

५. शिक्षक प्रशिक्षणावर अधिक भर देण्यात यावा.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून पर्यावरण शिक्षकांनी सुचविलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

१. शैक्षणिक साधनांची उपलब्धता असावी.

२. पर्यावरण शिक्षण विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नेमण्यात यावा.

३. विद्यापीठातील पुस्तकांची भाषा अवघड नसावी.

४. अभ्यासक्रमाची पुर्नरचना करणे आवश्यक आहे.

## सारणी क्र. ५९
## पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शिक्षकांच्या संदर्भात मुख्याध्यापक/प्राचार्यांनी सुचविलेले उपाय

| मुख्याध्यापक/प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.२५ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शिक्षकासंदर्भात आपण कोणते उपाय सुचवाल? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| तज्ज्ञ शिक्षकांकडून प्रशिक्षण आवश्यक | ७ | ५४% | ३ | ७५% | ०० | ०० |
| शिक्षकांना जादा तासिका (प्रशिक्षणासाठी) | ४ | ३१% | ०० | ०० | ०० | ०० |
| शासनाकडून आर्थिक तरतूद व्हावी | ४ | ३१% | ०० | ०० | ०० | ०० |
| पर्यावरण शिक्षक पर्यावरणशास्त्रात पदवीधारक असावा. | ०० | ०० | २ | ५०% | ३ | १००% |

### निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. ५४% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शिक्षकासंदर्भात उपाय म्हणजे तज्ज्ञ शिक्षकांकडून प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ३१% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शिक्षकासंदर्भात उपाय म्हणजे शिक्षकांना प्रशिक्षणासाठी जादा तासिका दयाव्यात. उर्वरित ३१% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शासनाकडून आर्थिक तरतूद व्हावी.

२. कनिष्ट महाविदयालयांच्या ७५% प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शिक्षकासंदर्भात उपाय म्हणजे तज्ज्ञ शिक्षकांकडून प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. उर्वरित ५०% प्राचार्यांच्या मते पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शिक्षकासंदर्भात उपाय म्हणजे पर्यावरण शिक्षक, पर्यावरणशास्त्र विषयाचा पदवीधारक असावा.

३. वरिष्ठ महाविदयालयांच्या १००% प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून शिक्षकासंदर्भात उपाय म्हणजे पर्यावरण शिक्षक पर्यावरणशास्त्र विषयात पदवीधर असावा.

**अर्थनिर्वचन**

यावरुन असे म्हणता येते की,

१. मुख्याध्यापकांनी इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांच्या संदर्भात सुचवलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

    १. शिक्षकांना प्रशिक्षणासाठी जादा तासिका दयाव्यात.

    २. शासनाकडून पर्यावरण शिक्षणासाठी आर्थिक तरतूद व्हावी.

२. कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांनी इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकांसंदर्भात सुचवलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

    १. तज्ज्ञ शिक्षकांकडून प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

    २. पर्यावरण शिक्षण विषयाचा शिक्षक पर्यावरणशास्त्र विषयांचा पदवीधर असावा.

३. वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांनी एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी शिक्षकासंदर्भात, सुचवलेले उपाय पुढीलप्रमाणे आहे.

१. पर्यावरण शिक्षक पर्यावरण शास्त्र विषयाचा पदवीधर असावा.

**सारणी क्र. ६०**

**पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून विद्यार्थ्यासंदर्भात मुख्याध्यापकांनी/प्राचार्यांनी सुचविलेले उपाय.**

| मुख्याध्यापक/प्राचार्य प्रश्नावली प्रश्न क्र.२५ | इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस. वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीच्या पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून विद्यार्थ्यांच्या संदर्भात कोणत्या सूचना सुचवाल? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – १३ मुख्याध्यापक) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – ४ प्राचार्य) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये– ३ प्राचार्य) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो व्याख्यानावर भर दयावा. | ९ | ७०% | २ | ५०% | ३ | १००% |
| मूल्यमापन करताना श्रेणीऐवजी गुण दयावे. | ३ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |
| विद्यार्थ्यांच्या कृतीशीलतेला वाव दयावा. | २ | १५% | ३ | ७५% | ०० | ०० |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ७०% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून विद्यार्थी संदर्भात क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो, व्याख्यानावर भर दयावा. २३% मुख्याध्यापकांच्या मते इ.९वी, १०वीसाठी मूल्यमापन करताना श्रेणीऐवजी गुण देण्यात यावे. उर्वरित १५% मुख्याध्यापकांच्या मते विद्यार्थ्यांच्या कृतीशीलतेला वाव दयावा.

२. कनिष्ठ महाविदयालयाच्या ५०% प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून विद्यार्थी संदर्भात क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो, व्याख्यानावर भर दयावा. उर्वरित ७५% प्राचार्यांच्या मते इ.११वी, १२वीसाठी विद्यार्थ्यांच्या कृतीशीलतेला वाव दयावा.

३. वरिष्ठ महाविदयालयाच्या १००% प्राचार्यांच्या मते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून विद्यार्थ्यासंदर्भात क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो, व्याख्यानावर भर दयावा.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून विद्यार्थ्यांसंदर्भात मुख्याध्यापकांनी सुचवलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

अ. क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो, व्याख्यानावर भर दयावा.

ब. मूल्यमापन काढताना श्रेणीऐवजी गुण दयावे.

क. विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला वाव दयावा.

२. कनिष्ठ महाविदयालयाच्या इ.११वी, १२वीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून विद्यार्थ्यासंदर्भात प्राचार्यांनी सुचविलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

अ. विद्यार्थ्यासंदर्भात क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो, व्याख्यानावर भर दयावा.

ब. विद्यार्थ्यांच्या कृतिशीलतेला वाव दयावा.

३. वरिष्ठ महाविदयालयाच्या एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाचा दर्जा सुधारावा म्हणून विद्यार्थ्यासंदर्भात प्राचार्यांनी सुचविलेले उपाय पुढीलप्रमाणे आहेत.

अ. क्षेत्रभेट, सहल, स्लाईड शो व व्याख्यानावर भर दयावा.

**सारणी क्र ६१**

**विद्यार्थ्यांसाठी पाठयपुस्तकांची उपलब्धता**

| **विद्यार्थी मुलाखत प्रश्न क्र.१** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या वर्गाची पर्यावरण शिक्षणाची पाठयपुस्तके उपलब्ध झाली आहेत की नाही?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – ७८ विद्यार्थी) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये –२४ विद्यार्थी) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – २१ विद्यार्थी) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| होय | ६० | ७७% | २४ | १००% | २१ | १००% |
| नाही | १८ | २३% | ०० | ०० | शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेले पुस्तक. | |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ७७% विद्यार्थ्यांना इ.९वी, १०वीच्या वर्गाची क्रमिक पाठयपुस्तके उपलब्ध झाली आहेत. उर्वरित २३% विद्यार्थ्यांना इ.९वी, १०वीच्या वर्गाची क्रमिक पाठयपुस्तके त्यांना उपलब्ध झाली नाहीत.

२. इ.११वी, १२वीच्या १००% विद्यार्थ्यांना इ.११वी, व इ.१२वीच्या वर्गाची क्रमिक पाठयपुस्तके त्यांना उपलब्ध झाली आहेत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% विद्यार्थ्यांना एस.वाय.बी.ए./ बी.कॉम./बी.एस्सीच्या वर्गाची पुस्तके उपलब्ध झाली आहेत. शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेले पुस्तक उपलब्ध आहे.

**अर्थनिर्वचन**

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीच्या बहुतांशी (७७%) विद्यार्थ्यांना इ.९वी व इ.१०वीच्या वर्गाची क्रमिक पाठयपुस्तके उपलब्ध झाली आहेत. अत्यल्प (२३%) विद्यार्थ्यांना इ.९वी व इ.१०वीच्या वर्गाची क्रमिक पाठयपुस्तके उपलब्ध झाली नाहीत.

२. इ.११वी, १२वीच्या सर्व (१००%) विद्यार्थ्यांना इ.११वी व १२वीच्या वर्गाची क्रमिक पाठयपुस्तके उपलब्ध झाली आहेत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या सर्व (१००%) विद्यार्थ्यांना एस.वाय. बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या वर्गाची क्रमिक पाठयपुस्तके उपलब्ध झाली आहेत. शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केलेले पुस्तक उपलब्ध आहे.

**सारणी क्र. ६२**
**पर्यावरण अभ्यासासाठी पाठयपुस्तकाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या वापराचे साहित्य.**

| विद्यार्थी मुलाखत प्रश्न क्र.२ | पाठयपुस्तकाव्यतिरिक्त कोणते साहित्य अभ्यासासाठी वापरता? | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उत्तरे | इ.९वी, १०वी (१३ शाळा – ७८ विद्यार्थी) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये –२४ विद्यार्थी) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – २१ विद्यार्थी) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| पर्यावरणविषयक इतर पुस्तके व मासिके | ५० | ६४% | १६ | ६७% | ५ | २४% |
| वर्तमानपत्र | २५ | ३३% | १० | ४२% | ५ | २४% |
| सी.डी. | १३ | १६% | ०० | ०० | ०० | ०० |
| इंटरनेट | ०० | ०० | ०० | ०० | १० | ४८% |
| संदर्भग्रंथ | ०० | ०० | ०० | ०० | ५ | २४% |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. ६४% विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार इ.९वी व इ.१०वीच्या पर्यावरण अभ्यासासाठी पर्यावरण विषयक इतर पुस्तके व मासिके वापरतात. ३३% विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते इ.९वी व १०वीच्या पर्यावरण अभ्यासासाठी वर्तमानपत्र वापरतात. उर्वरित १६% विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते सी.डी. वापरतात.

२. इ.११वी, १२वीच्या ६७% विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते इ.११वी व इ.१२वीसाठी पाठयपुस्तकाव्यतिरिक्त पर्यावरण विषयक इतर पुस्तके, मासिके अभ्यासासाठी वापरतात. उर्वरित ४२% विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते इ.११वी व १२वीसाठी पाठयपुस्तकाव्यतिरिक्त वर्तमानपत्र अभ्यासासाठी वापरतात.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या २४% विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या पुस्तका-व्यतिरिक्त पर्यावरण विषयक इतर पुस्तके, मासिके अभ्यासासाठी वापरतात. २४% विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते एस.वाय.बी.ए./बी.कॉम. /बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या पुस्तकाव्यतिरिक्त वर्तमानपत्र वापरतात. ४८% विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीसाठी सी.डी.चा वापर करतात. उर्वरित २४% विद्यार्थी पर्यावरण शिक्षणाच्या पुस्तकाव्यतिरिक्त अभ्यासासाठी इंटरनेटचा वापर करतात.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येईल की,

१. बहुतांशी (६४%) विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते इ.९वी, १०वीसाठी पाठयपुस्तकाव्यतिरिक्त पर्यावरण विषयक इतर पुस्तके, मासिके अभ्यासासाठी

वापरतात. अल्प (३३%) विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते पाठयपुस्तका व्यतिरिक्त वर्तमानपत्र अभ्यासासाठी वापरतात. उर्वरित अत्यल्प (१६%) विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते इ.९वी व इ.१०वीसाठी पाठयपुस्तकाव्यतिरिक्त सी.डी. अभ्यासासाठी वापरतात.

२. बहुतांशी (६७%) विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते इ.११वी व इ.१२वीसाठी पाठयपुस्तकाव्यतिरिक्त पर्यावरण विषयक इतर पुस्तके, मासिके अभ्यासासाठी वापरतात. उर्वरित अल्प (४२%) विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते वर्तमानपत्र अभ्यासासाठी वापरतात.

३. अत्यल्प (२४%) विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते एस.वाय.बी.ए./बी.कॉम./ बी.एस्सीसाठी पर्यावरण शिक्षणाच्या पुस्तकाव्यतिरिक्त पर्यावरण विषयक इतर पुस्तके व मासिके अभ्यासासाठी वापरतात. जवळपास निम्म्या (४८%) विद्यार्थ्यांच्या सांगण्यानुसार ते इंटरनेटचा वापर करतात. उर्वरित अत्यल्प (२४%) विद्यार्थी अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथांचा वापर करतात.

**सारणी क्र. ६३**

**पर्यावरण शिक्षण या विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतीच्या वापराबाबतची विद्यार्थ्यांची मते**

| **विद्यार्थी मुलाखत प्रश्न क्र.३** | **इ.९वी, १०वी/इ.११वी, १२वी/एस.वाय.बी.ए./बी.कॉम. / बी.एस्सीमधील पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण शिक्षण या विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतीचा वापर करून शिकविता का?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – ७८ विद्यार्थी) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – २४ विद्यार्थी) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – २१ विद्यार्थी) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| होय | ४८ | ६२% | १५ | ६३% | २१ | १००% |
| नाही | ३० | ३८% | ९ | ३७% | ०० | ०० |

## निरीक्षण

वरील सारणीवरून असे दिसते की,

१. इ.९वी, १०वीच्या ६२% विद्यार्थ्यांच्या मते त्यांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक, पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करतात. उर्वरित ३८% विद्यार्थ्यांच्या मते त्यांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करत नाहीत.

२. इ.११वी, १२वीच्या ६३% विद्यार्थ्यांच्या मते त्यांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करतात. उर्वरित ३७% विद्यार्थ्यांच्या मते त्यांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या १००% विद्यार्थ्यांच्या मते त्यांना एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. वर्गांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करतात.

## अर्थनिर्वचन

यावरून असे म्हणता येईल की,

१. इ.९वी, १०वीच्या बहुतांशी (६२%) विद्यार्थ्यांच्या मते त्यांना पर्यावरण शिक्षण हा विषय शिकविणारे शिक्षक पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतीचा वापर करतात. उर्वरित अल्प (३८%) विद्यार्थ्यांच्या मते

त्यांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण शिक्षण या विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करत नाहीत.

२. इ.११वी, १२वीच्या बहुतांशी (६३%) विद्यार्थ्यांच्या मते त्यांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करतात. अल्प (३७%) विद्यार्थ्यांच्या मते इ.११वी व इ.१२वीच्या वर्गांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करत नाहीत.

३. एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सीच्या सर्व (१००%) विद्यार्थ्यांच्या मते त्यांना पर्यावरण शिक्षण शिकविणारे शिक्षक पर्यावरण विषयासंबंधी अद्ययावत ज्ञान व अध्यापन पध्दतींचा वापर करतात.

**सारणी क्र. ६४**

**पर्यावरण शिक्षणाशी संबंधित वापरल्या जाणाऱ्या शैक्षणिक साधनांबाबत विद्यार्थ्यांनी दिलेली माहिती.**

| **विद्यार्थी मुलाखत प्रश्न क्र.४** | **शाळेमध्ये/महाविद्यालयामध्ये पर्यावरण शिक्षण विषयासंबंधी कोणती शैक्षणिक साधने तुम्हाला दाखविली जातात?** | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **उत्तरे** | इ.९वी, १०वी (१३ शाळा – ७८ विद्यार्थी) | | इ.११वी, १२वी (४ कनिष्ठ महाविद्यालये – २४ विद्यार्थी) | | एस.वाय.बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी. (३ वरिष्ठ महाविद्यालये – २१ विद्यार्थी) | |
| | संख्या | टक्के | संख्या | टक्के | संख्या | टक्के |
| प्रतिकृती | ३ | २३% | ०० | ०० | ०० | ०० |
| तक्ते | ६ | ४६% | २ | ५०% | १ | ३३% |
| भित्तीपत्रके | १ | ०८% | ०० | ०० | १ | ३३% |
| सी.डी. | १ | ०८% | २ | ५०% | १ | ३३% |
| स्लाईडज् | २ | १५% | ०० | ०० | ०० | ०० |

**निरीक्षण**

वरील सारणीवरून असे दिसून येते की,

१. २३% शाळांतील इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाचे अध्यापन करताना प्रतिकृतीचा वापर करतात असे सांगितले. ४६% शाळांतील इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाचे अध्यापन करताना तक्त्याचा वापर करतात असे सांगितले, ८% शाळांतील इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाचे अध्यापन करताना भित्तीपत्रकांचा वापर करतात असे सांगितले. ८% शाळांतील इ.९वी, १०वीच्या विद्यार्थ्यांना त्यांचे पर्यावरण शिक्षक पर्यावरण शिक्षणाचे अध्यापन करताना सी.डी. वापरतात. उर्वरित १५% शाळांतील पर्यावरण शिक्षक आपल्या अध्यापनात स्लाईडजचा वापर करतात.

